रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १८५
www.ramprahar.com
◆ बुधवार, २१ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

अर्ज दाखल करण्यासाठी रायगडात उमेदवारांची लगबग/२
गव्हाण फाटा-चिरनेर मार्गावरील पूल मार्चअखेर होणार खुला/६
अलिबागमध्ये रंगणार राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धा/८

## महाराष्ट्रातील नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाचे सादरीकरण



**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील नद्यांना प्रदूषणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी राज्य सरकारने ऐतिहासिक पुढाकार घेत राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्याची महत्त्वपूर्ण संकल्पना मांडली होती. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन या संदर्भातील प्रस्तावाचे सादरीकरण केले. या बैठकीस राष्ट्रीय नदी संरक्षण संचलनालयाचे (एनआरसीडी) संचालक राजेश कुमार, राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज यांसह केंद्र व राज्यातील इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या प्राधिकरणास मंजुरी मिळाल्यास ते देशातील पहिले प्राधिकरण ठरणार असल्याचे मंत्री मुंडे यांनी सांगितले.

### रायगड जि.प. आणि पनवेल पं.स. निवडणूक

# उमेदवारांचे अर्ज दाखल करण्यास भाजपकडून सुरुवात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून येत्या यासाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांनी मंगळवारी (दि. २०) आपले उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे आणि राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली ही अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पार पडली.

या वेळी उमेदवारांसोबत आमदार प्रशांत ठाकूर, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, नगरसेवक शशिकांत शेळके, नगरसेविका प्रतिभा भोईर, माजी जिल्हा परिषद सदस्य एकनाथ देशेकर, अमित जाधव, ज्ञानेश्वर घरत, माजी पंचायत समिती उपसभापती जीवन म्हात्रे, माजी सदस्य रत्नप्रभा घरत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह कृष्णा पाटील, संतोष पाटील, शिवाजी दुर्गे, महेश पाटील, विजय मुरकुटे, डॉ. संतोष आगलावे, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, विद्याधर मोकल, विद्याधर जोशी, सरपंच रजनी ठाकूर, सुशील ठाकूर तसेच पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अर्ज दाखल करण्यासाठी पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयापासून ढोल-ताशाच्या गजरात व घोषणा देत रॅली काढण्यात आली. ही रॅली पनवेल तहसीलदार कार्यालयात पोहचून निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. केळवणे जिल्हा परिषद मतदारसंघातून मंगेश वाकडीकर, वावंजे जिल्हा परिषद मतदारसंघातून कमला देशेकर यांनी, वावंजे पंचायत समिती गणासाठी आरती कुणाल काटे, चिंध्रण पंचायत समिती गणातून अंकुश खेर यांनी मंगळवारी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. उर्वरित जिल्हा परिषद व पंचायत समिती गणातील उमेदवार बुधवारी (दि. २१) अर्ज दाखल करणार आहेत.

अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख २१ जानेवारी असून २२ जानेवारीला छाननी होणार आहे. त्यानंतर ५ फेब्रुवारी रोजी मतदान, तर ७ फेब्रुवारीला मतमोजणी पनवेल शहरातील व्ही.के. हायस्कूल येथे होणार आहे.

# महाराष्ट्र भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस -मुख्यमंत्री फडणवीस

## दावोसमध्ये पहिल्याच दिवशी १९ सामंजस्य करार



**दावोस : वृत्तसंस्था**

भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्रच गेटवे-ऑफ-इंडिया असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे १९ गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणुकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधी मंडळ दावोस येथे उपस्थित आहे. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

तत्पूर्वी दावोसमधील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते, उद्योगमंत्री सामंत यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. भविष्याचे वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस म्हणून महाराष्ट्र जगाला, उद्योग विश्वाला साद घालत आहे, अशी मनोदय भावनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केली.

दावोसमधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरू केले. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरू झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे चित्र निर्माण झाले.

सामंजस्य करारांवरील स्वाक्षरी व करारांच्या आदान-प्रदान प्रसंगी झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा, गुंतवणुकदारांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आम्ही सदैव सज्ज आहोत. येथे होणाऱ्या करारांवरील पुढील कार्यवाहीबाबत वॉर रूमच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येईल. उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत आणि दर्जदार पद्धतीने मिळाव्यात याची काळजी घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

### गुंतवणुकीचा ओघ आणखी वाढला

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार गतवर्षी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष ('मैत्री') या गुंतवणूक आणि उद्योग सुलभतेला प्रोत्साहन देणाऱ्या समर्पित संस्थात्मक व्यवस्थेमुळे यंदा गुंतवणूकदार, उद्योग क्षेत्राचा महाराष्ट्राकडील ओघ आणखी वाढला आहे. उद्योजक-गुंतवणूकदारांकडून मिळत असलेला प्रतिसाद पाहता यंदा गतवर्षीहून अधिक गुंतवणूक आणि रोजगार संधीचे सामंजस्य करार होतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

## निवडक

### भारत आणि यूएईमध्ये अनेक करारांवर स्वाक्षऱ्या

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी नवी दिल्लीत संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा केली. या बैठकीदरम्यान, भारत आणि यूएई यांच्यात संरक्षण, अंतराळ, ऊर्जा, सुपरकंप्यूटिंग आणि अन्न सुरक्षा या क्षेत्रांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या तसेच दोन्ही नेत्यांनी सर्व प्रकारच्या दहशतवादाचा निषेध केला.

### यंदा कर्तव्य पथावर होणार भारताच्या सामर्थ्याचे प्रदर्शन

**नवी दिल्ली :** भारताच्या कर्तव्य पथ (प्रजासत्ताक दिन परेड)वर यंदा देशाच्या संरक्षण आणि सामर्थ्याचे प्रदर्शन होणार आहे. पाकिस्तानसह कोणत्याही शत्रूला धडकी भरवणाऱ्या आधुनिक व स्वदेशी निर्मित शस्त्रसज्ज्ता तसेच लष्करी प्रणाली या वेळी परेडमध्ये प्रदर्शित होणार आहे. या उपकरणांपैकी अनेकांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये पराक्रम सिद्ध केला आहे. याशिवाय २९ विमानांचा फ्लायपास्ट, भैरव कमांडो आणि विविध दलेदेखील परेडसाठी सज्ज आहेत.

# भाजप एक संस्कार -पीएम मोदी

## नितीन नवीन यांनी स्वीकारली अध्यक्षपदाची सूत्रे



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भाजप केवळ एक राजकीय पक्ष नसून तो एक संस्कार आणि परिवार आहे. या पक्षात केवळ सदस्यत्व नसते, तर आपण एकमेकांशी नात्याने जोडले गेलो आहोत. भाजप ही अशी परंपरा आहे, जिथे काम केवळ पदाने नाही, तर एका निश्चित प्रक्रियेने चालते. पद मिळणे ही तात्पुरती व्यवस्था असू शकते, पण देशासाठी काम करणे ही आपल्यासाठी आजीवन जबाबदारी आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नमूद केले. ते मंगळवारी (दि. २०) भाजपचे नवनियुक्त राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या पदग्रहण सोहळ्यात बोलत होते.

भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नितीन नवीन यांची बिनविरोध निवड झाली असून दिल्लीतील पक्षाच्या मुख्य कार्यालयात याची अधिकृत घोषणा करण्यात आली. यानंतर त्यांनी मंगळवारी अध्यक्षपदाची औपचारिकपणे सूत्रे स्वीकारली. या कार्यक्रमास पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी आदी दिग्गज उपस्थित होते.

या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. २१व्या शतकातील पहिली २५ वर्षे सरली असून आगामी २५ वर्षांचा कालखंड भारतासाठी अत्यंत निर्णायक आहे. याच कालखंडात विकसित भारताचे स्वप्न साकार होणार आहे आणि या महत्त्वाच्या प्रवासाच्या सुरुवातीला नितीन नवीन भाजपचा वारसा समर्थपणे पुढे नेतील, असा विश्वास पंतप्रधान मोदींनी व्यक्त केला.

या वेळी बोलताना पंतप्रधानांनी नितीन नवीन यांना भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या तसेच मी कार्यकर्ता आणि नितीन नवीन माझेही बॉस आहेत, असे म्हणत पक्षसंघटनेत कार्यकर्त्याचे स्थान सर्वोच्च असल्याचे अधोरेखित केले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मच्छीमार सहकारी संस्थेचे उद्घाटन

## कोंबडभुजे येथे कोळी बांधवांना कायद्याचे कवच



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मासेमारी करणाऱ्या कष्टकरी कोळी बांधवांना सरकारचे आणि कायद्याचे संरक्षण मिळणे गरजेचे असून नांदाई माता मच्छीमार सहकारी संस्थेच्या स्थापनेमुळे हे कवच आता स्थानिक मच्छीमारांना उपलब्ध होणार आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कोंबडभुजे येथे केले.

कोंबडभुजे येथे नव्याने नांदाई माता मच्छीमार वि.का. सहकारी संस्था स्थापन झाली आहे. या संस्थेचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १९) झाले. या वेळी बोलताना त्यांनी मच्छीमारांच्या संघर्षाची जाणीव करून दिली. मच्छीमारांचे जीवन अत्यंत कष्टाचे असून त्यांना सातत्याने नैसर्गिक आपत्ती आणि विविध समस्यांचा सामना करत आपला व्यवसाय करावा लागतो, असे त्यांनी नमूद केले.

केंद्र आणि राज्य सरकारमार्फत मच्छीमारांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जातात. या सर्व योजनांचा लाभ नांदाई माता संस्थेच्या माध्यमातून थेट मच्छीमार बांधवांपर्यंत पोहचवणे सुलभ होईल, असे सांगून हा व्यवसाय कायदेशीर चौकटीत बसवण्यासाठी संस्थेची स्थापना करण्यात सतीश कोळी यांनी घेतलेल्या पुढाकाराचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले.

उद्घाटन समारंभाला ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, निलेश खारकर, संस्थेचे चेअरमन सतीश कोळी, सचिव देवधर कोळी यांच्यासह नरहरी कोळी, अनिकेत भगत, शैलेश भगत, वितेश म्हात्रे, रूपेश मोहिते, उत्तम कोळी, गुलाब म्हात्रे, अखिलेश यादव, मच्छिंद्र कोळी, सुजित मोकल, मार्तंड नाखवा, रमेश ठाकूर, विजय घरत, प्रणय कोळी, नामदेव ठाकूर, माणिक कोळी, वामनशेठ म्हात्रे, हरिश्चंद्र भोईर आदी पदाधिकारी व विविध संस्थांचे चेअरमन उपस्थित होते.

# जासईतील शेकाप कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**उरण : वार्ताहर**

आमदार महेश बालदी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून उरण तालुक्यातील जासई येथील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी (दि. २०) भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. आमदार महेश बालादी यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले.

या कार्यक्रमास उरणचे उपनगराध्यक्ष रवी भोईर, भाजपचे जासई विभाग अध्यक्ष गोपीनाथ म्हात्रे, तालुका चिटणीस बळीशेठ घरत, माजी जि.प. सदस्य विजय भोईर, जिल्हा कार्यकारिणी सदस्य सुनील पाटील, शेखर तांडेल, निलेश पाटील, जासई गाव अध्यक्ष सुनील घरत, ग्रामपंचायत सदस्य भूषण म्हात्रे, आनंद म्हात्रे, अश्वीत घरत, रमाकांत म्हात्रे, सुरज ठवले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### आमदार महेश बालदी यांच्याकडून स्वागत

या वेळी जासई ग्रामपंचायतीचे शेकाप सदस्य प्रशांत म्हात्रे यांच्यासह शशिकांत म्हात्रे, अमित म्हात्रे, रतेश म्हात्रे, योगेश म्हात्रे, सुशांत घरत, सर्वेश ठाकूर, अनिकेत म्हात्रे, प्रल्हाद म्हात्रे, करण कातकरी, निशांत मढवी, प्रितेश म्हात्रे, दिनेश म्हात्रे आदी कार्यकर्त्यांनी विकासाचे 'कमळ' हाती घेतले.

# सुधागड तालुक्यात बिबट्याची दहशत

## पाच्छापूर परिसरात मादीसह पिल्लांचा वावर



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पाच्छापूर परिसरात रविवारी रात्रीच्या सुमारास एक मादी बिबट्या आणि तिची तीन पिल्ले आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. यामुळे पाच्छापूरसह आजूबाजूच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत नागरिकांना सतर्कतेचे आवाहन केले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास मयूर झोरे हा तरुण कामावरून घरी परतत असताना पाच्छापूर हद्दीतील जाईचा माळ या ठिकाणी त्याला रस्त्यालगत मादी बिबट्या आणि तिच्यासोबत तीन बछडे दिसले. या वेळी कारमधून जाणारे शेखर राऊत यांच्या कारच्या डॅश कॅमेऱ्यामध्येसुद्धा हे बिबटे दिसून आले.

याबाबत पाच्छापूरच्या ग्रामस्थांनी एकत्र येत वनविभागाला याची कल्पना दिली. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत परिसराची पाहणी केली. पाहणीदरम्यान बिबट्याच्या पाऊलखुणा आढळून आल्या असून या भागात बिबट्याचा वावर असल्याचे वनविभागाने स्पष्ट केले आहे.

*लोकांनी कृपया घाबरू जाऊ नये, पण सावधगिरी बाळगावी. पहाटे व संध्याकाळनंतर एकटे शेतात, जंगलात किंवा बाहेर जाऊ नका. लहान मुले, पाळीव प्राणी आणि जनावरे सुरक्षित ठेवा. बिबट्याचे दर्शन झाल्यास वन विभाग, वनरक्षक किंवा स्थानिक पोलिसांना कळवा. अफवा पसरवू नका. सुरक्षित राहा आणि एकमेकांना सावध करा.*

***-विशाल सोनावणे,*** *वनपरिक्षेत्र अधिकारी, सुधागड*

# अर्ज दाखल करण्यासाठी रायगडात उमेदवारांची लगबग

## जि.प. आणि पं.स. निवडणुकीची रणधुमाळी

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मंगळवारी ( दि. २०) अलिबाग तहसील कार्यालयात उमेदवारांनी गर्दी केली होती. पंचायत समितीसाठी ४५ तर जिल्हा परिषदेसाठी २६ जणांनी उमेदवारी अर्ज भरले. उमेदवारांची गर्दी झाल्यामुळे टोकन नंबर देण्यात आले होते. रात्री उशिरा पर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होती. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख २१ जानेवारी आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची वेळ ही सकाळी दहा ते दुपारी तीन वाजेपर्यंत होती. मात्र एकाच वेळी मोठ्या संख्येनी इच्छुक उमेदवार दाखल झाल्याने, निवडणूक यंत्रणांची तारांबळ उडाली होती. शेवटी पावणे तीन वाजता टोकन देऊन उमेदवारांचे अर्ज दाखल करून घेण्याचा निर्णय अधिकाऱ्यांनी घेतला.

अलिबागमध्ये शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना शिंदे गट, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले. शिवसेना शिंदे गटाकडून रसिका केणी, अनंत गोंधळी, शेकाप कडून, प्रिया ढवळे, अभिशेख पाटील, सानिका घरत, प्रफुल्ल पाटील यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले. तर भाजप कडून प्रियदर्शनी पाटील, संजय पाटील, शिवसेना ठाकरे गटाकडून सुरेंद्र म्हात्रे यांनी आपला अर्ज भरला. काँग्रेसच्या राजा ठाकूर आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या श्रीधर भोपी, अमित नाईक, उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे.

## पोलादपूरमध्ये शिवसेनेच्या पाच आणि भाजपच्या एका उमेदवाराचा अर्ज दाखल



**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यामध्ये शिवसेनेच्या दोन जिल्हा परिषद गट व तीन पंचायत समिती गणाच्या उमेदवारांनी मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या उपस्थितीत नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्णय अधिकारी मीनाक्षी राठोड यांच्याकडे सादर केले.

याप्रसंगी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी विधानसभा निवडणुकीत आपणास चार पंचायत समिती गणातून साडेपाच हजारांपेक्षा जास्त मताधिक्य पोलादपूर तालुक्याने दिले यात यावेळी भर पडली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करून वरच्या पातळीवरील राजकारणासाठी पंचायत समितीच्या चौथ्या जागेचा विचार सुरू असून त्यावर सुध्दा निर्णय होईल, असे उपस्थित जनसमुदायाला सांगितले.

लोहारे जिल्हा परिषद गटामध्ये मागील वेळी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी करणारे सामाजिक कार्यकर्ते कृष्णा कदम यांनी यावेळी भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. याप्रसंगी कृष्णा कदम यांच्यासमवेत त्यांच्या पत्नी व मुलगा, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विठोबा पार्टे, शहर अध्यक्षा सारिका विचारे,नगरपंचायत विरोधी पक्षनेते दिलीप भागवत, काँग्रेस पक्षाचे माजी अध्यक्ष अनंत पार्टे, शिवसेना उबाठा पक्षाचे माजी नगरसेवक शिवराज पार्टे, महेश दरेकर, ॲड. सचिन गायकवाड, भाजपमध्ये प्रवेश केलेले सुरेंद्र चव्हाण, भाजपनेते राठोड तसेच श्रीकांत भिलारे, नामदेव शिंदे, महेश दरेकर तसेच राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

दिवसभरात पोलादपूर तालुक्यातील शिवसेनेचे पाच आणि भाजपचा एक असे केवळ सहा उमेदवारी अर्ज दाखल झाले असून काँग्रेस, जनता दल सेक्युलर, शिवसेना उबाठा, शेतकरी कामगार पक्ष, भाजप राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि अपक्ष उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे शेवटच्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी मीनाक्षी राठोड यांच्याकडे सादर केली जाणार असल्याने उमेदवारांची संख्या वाढण्याची चिन्हे दिसून येत आहे.



## महाडमध्ये जिल्हा परिषदेसाठी चार, पंचायत समितीसाठी १४ अर्ज

### विकास गोगावले यांचाही अर्ज दाखल

**महाड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद व महाड पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या आजच्या दिवशी शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित गट या दोन्ही पक्षांच्या उमेदवारांनी आज आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. शिवसेने कडून मंत्री भरत गोगावले यावेळी उपस्थिती होते. यावेळी सेनेकडून मोठे शक्ती प्रदर्शन देखील करण्यात आले. दरम्यान आज जिल्हा परिषदे साठी चार उमेदवारी अर्ज तर पंचायत समिती विभागासाठी १४ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. विशेष बाब म्हणजे विकास गोगावले यांचा देखील उमेदवार अर्ज दाखल झाला आहे

रायगड जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये महाड तालुक्यात पाच मतदारसंघातून तर महाड पंचायत समितीच्या १० मतदारसंघातून आज एकूण १८ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. १६ जानेवारी ते २१ जानेवारी अशी अर्ज दाखल करण्याची मुदत असताना देखील १९ जानेवारीपर्यंत एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नव्हता. शेवटचे दोन दिवस शिल्लक असताना आज दुपारी मंत्री भरत गोगावले यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना शिंदे गटाने आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. तसेच राष्ट्रवादी अजित दादा गटांनी देखील आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

महाड तालुक्यात सर्वात चर्चेचा विषय ठरलेल्या विकास गोगावले यांच्यावर गुन्हा दाखल असून सध्या ते फरार आहेत. ते उमेदवारी अर्ज भरणार की नाही? भरला तर कसा भरणार? असे अनेक प्रश्न महाडकरांना पडले होते. मात्र आज विकास भोगावले यांचे सुचक यांनी विकास गोगावले यांचा उमेदवारी अर्ज दाखल करून घेतला आहे.

आज जिल्हा परिषद मतदार संघातील चार उमेदवारी अर्ज तर पंचायत समिती साठी १४ उमेदवारी अर्ज दाखल झाले असुन यामध्ये जिल्हा परिषद बिरवाडी मधून मंदा ढेबे, खरवली मधून मनाली काळीजकर, नडगाव तर्फे बिरवाडी मधून विकास गोगावले, करंजाडी मधून रज्ञाक करंबेलकर यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. तर महाड पंचायत समिती च्या धामणे मधून अनिल जाधव व ओमकार जाधव, बिरवाडी मधून लक्ष्मण वाडकर, मयूर जाधव, व राजेश जाधव, वरंध मधून अमृता पांडे, नूतन मोरे व विजया साळुंखे, खरवली मधून दिव्या रेशीम, नेहा सकपाळ, नडगाव तर्फे बिरवाडी मधून रेणुका देशमुख, नाते मधून सुरेश महाडिक व अप्पर तुडील मधून संबिहा पाचकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी पोपटराव ओमासे यांनी दिली आहे.

## गोरेगाव जिल्हा परिषद गटातून पत्रकार भारत गोरेगावकर यांचा अर्ज दाखल



**माणगाव : प्रतिनिधी**

पत्रकार भारत विष्णु गोरेगावकर यांनी दि. २० जानेवारी रोजी गोरेगाव जिल्हा परिषद गटातून सपत्नीक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

यावेळी गोरेगाव सरपंच जुबेर अब्बासी, ज्येष्ठ नेते दिलीप शेठ, भूपेंद्र शेठ, उपसरपंच चंद्रकांत गोरेगावकर, सदस्य विनोद बागडे, दिनेश गोरीवले आदी उपस्थित होते.

भारत गोरेगावकर हे गेली अनेक वर्ष पत्रकार म्हणून कार्यरत आहेत. संपूर्ण जिल्ह्यात त्यांच नावलौकिक आहे. त्यांच्या माध्यमातून गोरेगाव विभागातील अनेक प्रश्नांना वाचा फोडण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने गोरेगाव विभागात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केली आहेत. भारत गोरेगावकर यांनी अनेक प्रश्नांवर आवाज उठवून ते शासन दरबारी मांडून मार्गी लावले आहेत. खा. सुनील तटकरे यांचे खंदे समर्थक म्हणून सुद्धा त्यांची एक वेगळी ओळख आहे.

## तळा तालुक्यात सर्व नवीन चेहऱ्यांना संधी

**तळा : प्रतिनीधी**

तळा तालुक्यातील दोन जिल्हा परिषद गट आणि चार पंचायत समिती गणासांठीनिवडणुक होत आहे. २० जानेवारी रोजी जिल्हा परिषदेच्या दोन गटात एकुण दोन तर पंचायत समितीच्या चार गणात एकुण ६ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी आजपर्यंत एकूण ८ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून ८ ही उमेदवारी अर्ज ६ पंचायत समिती व दोन जिल्हा परिषदेसाठी शिवसेना शिंदे गटांनी अर्ज दाखल केले आहेत. आज २० जानेवारी पर्यंत फक्त आठ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून आता शेवटच्या २१ जानेवारी या अखेरच्या दिवशी इतर उमेदवारी अर्ज दाखल होतील असा अंदाज आहे.

शिवसेना शिंदे गटांनी तळा बाजारपेठ ते तहसिल कार्यालय तळा येथे भव्य रॅली काढुन शक्ती प्रदर्शन केले यामधे मोठ्या सख्येने कार्यकर्ते सामिल झाले होते व यावेळी जिल्हा परिषद गट चरई खुर्द सुलभा संतोष काप व रहटाड रोहीणी रमेश पिंपळे शिवसेना शिंदे गट यांचे अर्ज दाखल केले आहेत.व बोरघरहवेली–अनंत वामन खराडे व संतोष नामदेव आमले,चरई खुर्द सुलभा संतोष काप रहाटाड चंद्रकांत विठ्ठल मुकण व कविता विठोबा मुर्तुग,मांदाड रोशनी रमेश तांदळेकर या पंचायत समिती गणात शिवसेना शिंदे गटाने आपले उमेदवारी अर्ज दाखल केले



## इंदापूर साई गटातून शक्तिप्रदर्शन करीत राष्ट्रवादीचे उमेदवारी अर्ज दाखल

**माणगाव : बातमीदार , प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसपक्षा कडून ४६ तळाशेत जिल्हापरिषद गटा मधून इंदापूर विभागातील घोटवळ या गावच्या भूवन ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच दिशा दिपक जाधव तसेच ९२ साई पं.स.गणातुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला अध्यक्षा संगीता संजय बकम तसेच ९१ तळाशेत पं.स.गणातील उमेदवार मनिषा संदेश मालोरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून रायगडचे खासदार सुनील तटकरे, ना.आदीतीताई तटकरे यांनी या तीन महिला उमेदवारांना उमेदवारी दिल्याने या उमेदवारांनी मंगळवार दि.२० जानेवारी २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता आपला उमेदवारी अर्ज माणगांव तहसील कार्यालयात जाऊन दाखल केला.

उमेदवारांचे अर्ज भरताना राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती ताई तटकरे उपस्थित होत्या. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी इंदापूर शहरातून भव्य अशी रॅली यावेळी काढण्यात आली.या रॅलीमध्ये इंदापूर, खरवली,साई विभागातून बहुसंख्य राष्ट्रवादीचे कार्यकर्ते, महीला कार्यकर्त्या तसेच तरूण – तरूणी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी इंदापूर बाजार पेठ संपूर्ण राष्ट्रवादीमय झाली होती.

माणगांव मधून हॉटेल आनंद भुवन येथे सर्व उमेदवार एकत्र येऊन माणगांव बाजारपेठेतुनही रॅली अशोकदादा साबळे स्कूलच्या मैदानावर येऊन या रॅलीचे सभेत रूपांतर झाली. राष्ट्रवादीच्या नेत्यांनी यावेळी मार्गदर्शन केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे,ड.राजीव साबळे,उपाध्यक्ष शेखरशेठ देशमुख ,माणगांव तालुका अध्यक्ष काका नवगणे,महाराष्ट्र युवक सचिव दिपकशेठ जाधव, उदय अधिकारी,बाळ खातू,संदेश मालोरे,नितिन घोणे, शुक्रदास मोरे, पिंट्या महाजन, मिलिंद खानविलकर, विजय बक्कम उपस्थित होते.



## अर्बन बँक इमारत लोकार्पण : खा. तटकरे आणि ना. गोगावले राहणार उपस्थित



**महाड : प्रतिनिधी**

दि अण्णासाहेब सावंत को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक महाड लिमिटेडच्या नूतन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड येथे संपन्न होणार आहे. 'आपली बँक आपली माणसं' या ब्रीदवाक्यावर विश्वासाचा पाया रचत गेली ९५ वर्षे रायगडच्या सामाजिक व आर्थिक जीवनात योगदान देणाऱ्या बँकेसाठी हा सोहळा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते हे लोकार्पण होणार असून त्यांच्यासह महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकासमंत्री भरतशेठ गोगावले तसेच महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, महाड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सुनील कविस्कर आणि माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप यांचीही उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन दि अण्णासाहेब सावंत को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक महाड लिमिटेडच्या संचालक मंडळ व कर्मचारी वृंद यांच्या वतीने करण्यात आले असून, या मंगलमय सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या चेअरमन शोभा सावंत यांनी केले आहे.

## शिर्डी पायी वारीतील साईभक्तांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

स्वामिनी चॅरिटेबल ट्रस्ट आणि रायगड हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने शिर्डी येथे पायी वारीने जाणाऱ्या साई भक्तांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन कर्जत येथे करण्यात आले होते. या शिबिराला साई भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन कर्जत नगरपरिषद नगराध्यक्षा पुष्पा दगडे यांच्या शुभहस्ते पार पडले. यावेळी त्यांनी पायी वारी करणाऱ्या भक्तांच्या आरोग्याची काळजी घेणारे असे उपक्रम समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले. सदर शिबिर यशस्वी होण्यासाठी स्वामिनी चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापक अध्यक्षा शिल्पा दगडे यांनी विशेष मेहनत घेतली.

त्यांना विजय दगडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच ट्रस्टचे पदाधिकारी व सभासद रेखा गोरे, यशवंत भाबल, दीपक



कुलकर्णी नगरसेवक महेंद्र चंदन नगरसेवक प्रशांत पाटिल नगरसेविका सुवर्णा जोशी तसेंच साई मंडळाचे संतोष दाभणे, आशिष कोल्हे, दीपक जाधव, सागर चौधरी, गौरव लाड, शैलेश मिसाळ, अनुकूल कदम,सागर तुपे, राजा लबडे ह्यांच्या उपस्थित उपक्रम पार पडला रायगड हॉस्पिटलचे डॉक्टर, परिचारिका तसेच स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

या शिबिरामध्ये रक्तदाब, मधुमेह, ताप, सर्दी–खोकला, अंगदुखी, पायांचे फोड, तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. गरज असलेल्या भक्तांना मोफत औषधांचे वाटपही करण्यात आले. या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा १५० हून अधिक साई भक्तांनी लाभ घेतला. पायी वारीदरम्यान भक्तांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या या उपक्रमाबद्दल साई भक्तांनी स्वामिनी चॅरिटेबल ट्रस्ट व रायगड हॉस्पिटलचे मनापासून आभार मानले.

## दुखवटा

### हिम्मतमल ढुमावत (ओसवाल)



**कर्जत :** शहरातील जेष्ठ व्यापारी हिम्मतमल भुरमल ओसवाल यांचे ९१ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. ते केवळ दुसरी शिकलेले होते. मात्र त्यांनी आपल्या दोन नातवांना डॉक्टर आणि एका नातवाला वकील केले. कर्जत मधील जैन मंदिर उभारणीच्या वेळी ते जैन श्वेतांबर संघांचे अध्यक्ष होते. त्यांच्या काळातच जैन मंदिराचा जीर्णोद्धार पार पडला. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सूना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

# चोरी आणि फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ

## दोन महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून चोरटे पसार

**पनवेल : वार्ताहर**

खारघर वसाहतीमध्ये अवघ्या दहा मिनिटांच्या अंतरात पायी चालणार्या दोन महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी हिसकावून पळ काढल्याच्या घटनांमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या दोन्ही घटना रात्री साडेदहा ते दहा वाजून चाळीस या वेळेत घडल्या असून, यामुळे पोलीस गस्त आणि महिला सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पहिली घटना रात्री साडेदहाच्या सुमारास सेक्टर १५ येथील पारीजात सोसायटीच्या गेटसमोरील रस्त्यावर घडली. ६३ वर्षीय ज्येष्ठ महिला शतपावलीसाठी रस्त्याने जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्यावर अचानक हल्ला केला. काही समजण्याच्या आतच चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून पळ काढला. या प्रकारामुळे महिला भीतीच्या सावटाखाली भेदरून गेल्या.




या घटनेनंतर अवघ्या दहा मिनिटांत, म्हणजेच रात्री दहा वाजून चाळीस मिनिटांनी, सेक्टर १९ येथील शाळेजवळील रस्त्यावर कॅनरा बँकेसमोरून जाणार्या दुसर्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्रही अशाच पद्धतीने हिसकावण्यात आले. दोन वेगवेगळ्या ठिकाणी सलग घडलेल्या या घटनांमुळे खारघर तसेच पनवेल परिसरातील महिलावर्गात तीव्र भीतीचे वातावरण पसरले आहे.

विशेष म्हणजे खारघरमध्ये मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही कॅमेर्यांचे जाळे असतानाही चोरट्यांना त्याची किंवा पोलिसांची कोणतीही भीती उरलेली नसल्याचे चित्र दिसून येत आहे. खारघरचा विस्तार वेगाने होत असताना रात्रीच्या वेळेस पोलीस गस्तीचे प्रमाण अपुरे असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

या दोन्ही घटनांची नोंद खारघर पोलीस ठाणे येथे करण्यात आली असून, सुमारे दोन लाख रुपये किमतीची दोन मंगळसूत्र चोरीस गेल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांत पनवेल व खारघर 'स्मार्ट सिटी' असल्याचे दावे केले जात असताना, प्रत्यक्षात महिलांच्या सुरक्षेबाबत गंभीर त्रुटी समोर येत आहेत

## पैसे मागण्याच्या वादातून मारहाण

**पनवेल :** पैसे मागण्याच्या वादावरून इसमाच्या डोक्यात लोखंडी सळीने मारहाण केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. समीर खान (वय ३५) असे या जखमी इसमाचे नाव असून पैसे मागण्याचे वादावरून आरोपी नायाब शेख याने समीर यांच्या डोक्यात लोखंडी सळीने मारून जखमी केले. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## मुलानेच केली वडिलांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

वडिलांच्या नावावर असलेल्या चार फ्लॅटचे बनावट भाडेकरारनामा बनवुन त्यावर वडिलांचे खोटया सहया करून परस्पर भाडयाने देत भाडयापोटी मिळणारी १७ लाख ४० हजार रुपयाची स्वतःकडे ठेवत वडिलांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

सेवानिवृत्त प्रकाश पाटील (वय–७१, रा नवीन पनवेल) यांच्या करंजाडे परिसरात असलेल्या चार फ्लॅटचे बनावट भाडेकरारनामा आरोपी प्रशांत पाटील याने बनवुन त्यावर वडिलांचे खोटया सहया करून परस्पर भाडयाने देत भाडयापोटी मिळणारी १७ लाख ४० हजार रुपयाची स्वतःकडे ठेवत वडिलांची आर्थिक फसवणूक केली.

## रस्त्यालगत कंटेनरची जीवघेणी पार्किंग; कारवाईची मागणी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**


पनवेल तालुक्यातील कोन–सावळामार्गे रोडवर मोठमोठे गोडाऊन लॉजिस्टिक असल्या कारनाने रात्री त्या कंटेनरची रस्त्यालगत पार्किंग केली जाते. त्यामुळे याचा त्रास प्रवासी, स्थानिकांना होत आहे.

कोन–सावळा मार्गे जाणारा रस्ता हा सध्या लॉजिस्टिक आणि गोडाऊनचे मोठे केंद्र बनले आहे. यामुळे रात्रीच्या वेळी रस्त्याच्या दुतर्फा होणारी कंटेनरची पार्किंग ही केवळ वाहतुकीसाठी अडथळा नसून अपघातांनाही निमंत्रण देणारी ठरत आहे.

या समस्येमुळे प्रवाशांना आणि स्थानिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी अंधारात उभे असलेले कंटेनर नीट दिसत नाहीत, ज्यामुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे भीषण अपघात होऊ शकतात. यापूर्वी झालेले देखील आहेत पण त्याकडे दुर्लक्ष केले जाते. अनेक गोडाऊन मालकांकडे स्वतःची पुरेशी पार्किंग नसल्यामुळे ते सार्वजनिक रस्त्याचा वापर करतात. यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. स्थानिक ट्राफिक पोलीस याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत.

## वाहनाच्या धडकेत इसम जखमी

**पनवेल : वार्ताहर**




अज्ञात वाहकाने दिलेल्या धडकेत एक ५४ वर्षीय इसम जखमी झाल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे. फिर्यादी विष्णू जिबल (वय ५४, रा पनवेल) हे पळस्पे परिसरात असताना वाहन क्रमांक एमएच ४३ सी ई ६८३१ वरिल अज्ञात चालकाने त्याच्या वाहनाने विष्णु जिबल यांना जोरदार धडक दिली. या धडकेत विष्णु जिबल गंभीर जखमी झाले. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## गळफास घेऊन तरुणीची हत्या

**पनवेल : वार्ताहर**

कोणत्या तरी अज्ञात कारणाने एका २५ वर्षीय तरुणीने फॅनला ओढणीच्या साहयाने गळफास घेवुन आत्महत्या केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.कांचन कश्यप असे मयत तरुणीचे नाव असून तिने करंजाडे येथील तिच्या राहते घरामध्ये कोणत्या तरी अज्ञात कारणाने फॅनला ओढणीच्या साहयाने गळफास घेवुन आत्महत्या केली. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अमली पदार्थ बाळगणाऱ्यास अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात २ लाख ८३ हजार रुपये किमतीचा अंमली पदार्थ बाळगणाऱ्या इसमास पनवेल शहर पोलिसांनी अटक केली. पनवेल शहरातील तक्का परिसरात अंमली पदार्थ विक्रीसाठी आरोपी येणार असल्याची माहिती पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना मिळाली होती.

त्यानुसार पोलीस निरीक्षक (गुन्हे) शाकीर पटेल, सहा. पोलीस निरीक्षक प्रविण फडतरे, पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे आणि हजरतअली पठाण आदींच्या पथकाने सापळा रचून आरोपी अनुरागकुमार यादव (वय ३३, रा बिहार) याला अटक केली. त्याच्या कडून पोलिसांनी अंमली पदार्थ तसेच इतर माल असा एकूण २ लाख ९४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये ह्युमन रोबोट

### भविष्याकडे एक पाऊल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये २० जानेवारी रोजी विद्यार्थ्यांना शिकवणारा व त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणारा ह्युमन रोबोट शिक्षक याचे भव्य उद्घाटन करण्यात आले.





या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष वाय.टी. देशमुख, जेबीएसपी संस्थेचे सदस्य ॲड. राहुल घरत, प्राचार्या राज आलोनी तसेच अन्य मान्यवरांच्या हस्ते या ह्युमन रोबोट शिक्षकाचे उद्घाटन झाले. हा उपक्रम शाळेच्या तांत्रिक प्रगतीच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला असून, ह्युमन रोबोट शिक्षकाच्या माध्यमातून भविष्यातील शिक्षणाची नवी दारे खुली झाली आहेत. यामुळे शाळेची नवकल्पनांप्रती असलेली बांधिलकी आणि भविष्याभिमुख शिक्षणाचा दृष्टिकोन अधोरेखित झाला. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने विविध एआय मॉडेल्स सादर करत कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानावरील आपले जान प्रभावीपणे मांडले. याच कार्यक्रमात ३डी फॅन आणि ३डी प्रिंटर यांचेही उद्घाटन करण्यात आले, ज्यामुळे उपस्थितांचे लक्ष वेधले गेले आणि STEM² शिक्षण क्षेत्रातील शाळेची प्रगत पायाभूत सुविधा अधोरेखित झाली.

कार्यक्रमाला संबोधित करताना अध्यक्षांनी व्यवस्थापन, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांच्या अथक प्रयत्नांचे कौतुक केले. RTPS ला तंत्रज्ञानस्नेही संस्थेत रूपांतरित करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे त्यांनी विशेष अभिनंदन केले आणि शाळेच्या नाविन्यपूर्ण वृत्तीचे कौतुक करत संपूर्ण शाळा परिवाराला त्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल शुभेच्छा दिल्या. उपाध्यक्ष व अन्य मान्यवरांनीही अशाच भावना व्यक्त करत विद्यार्थ्यांना सर्जनशीलता, जबाबदारी आणि जिज्ञासेने तंत्रज्ञान स्वीकारण्याचे आवाहन केले.

प्राचार्या राज आलोनी यांनी विद्यार्थ्यांच्या प्रशंसनीय कामगिरीचे व नाविन्यपूर्ण सादरीकरणाचे मनापासून कौतुक केले. हा समारंभ अभिमान आणि प्रेरणेच्या वातावरणात संपन्न झाला आणि अत्याधुनिक शिक्षण व मूल्यांच्या माध्यमातून भविष्यकालीन, नवोन्मेषी विद्यार्थी घडवण्याच्या RTPSच्या ध्येयाला अधिक बळ मिळाले.



**पनवेल : माजी सरकारी वकील मनोज म्हात्रे यांचा पुत्र डॉ. शिवम मनोज म्हात्रे हा वैद्यकीय पदवी परीक्षेत (बीएएमएस) उत्तीर्ण झाल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले. या प्रसंगी साप्ताहिक पनवेल टाइम्सचे संपादक गणेश कोळी, ज्येष्ठ साहित्यिक प्रा.चंद्रकांत मढवी, ॲड. मिलिंद सुर्यवंशी उपस्थित होते.**

## मुंबई विभागीय एनएसएस शिबिरात 'सीकेटी'च्या विद्यार्थिनींचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना मुंबई विभागस्तरिय नेतृत्व गुण व व्यक्तिमत्व विकास शिबिर आरोग्ययोग निसर्ग उपचार केंद्र जंबिलघर बदलापूर येथे दि.१८ ते २१ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आले होते. शिबिरात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक(सीकेटी ज्युनिअर कॉलेज) विद्यालयातील



११ वी आर्ट्स वर्गातील नंदिनी गणेश वाघमारे व दक्षता प्रकाश रिसबूड या दोन विद्यार्थिनींनी सहभाग घेतला आहे.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या शिबिरासाठी १२० सन्मानचिन्हे भेट म्हणून दिली आहेत त्याबद्दल विभागीय समन्वयक विनोद गवारे यांनी त्यांचे आभार मानले . तसेच या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यासाठी सोबत सहाय्यक शिक्षक व एनएसएस कार्यक्रम अधिकारी निखिलेश देशमूख उपस्थित आहेत.

शिबिरात प्रत्येक दिवशी सकाळी ६.३० वाजल्यापासून योगा त्यानंतर ९.०० वाजल्यापासून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित करण्याच्या दृष्टीने सामाजिक बांधिलकी, महिला नेतृत्व, जीवन कौशल्य, आर्मी आणि पोलिस यांच्या सोबत टॉक शो, भारतीय संविधान, शिवाजी महाराज ऐकावे की आचरावे, विद्यार्थ्यांच्या सहभागासहित विविध विषयांवर ग्रुप चर्चा, नागरी भावना या विषयांवर विविध व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. रात्री एक तास मनोरंजनपर कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी आपल्यातील सुप्त कलागुणांचे सादरीकरण केले.



**पनवले : महापालिकेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली महायुतीचे ५९ नगरसेवक विजयी झाले. यामध्ये प्रभाग क्रमांक १७मधून भाजप महायुतीचे उमेदवार ॲड.प्रकाश बिनेदार हे भरघोस मतांनी विजयी झाले. याबद्दल त्यांनी मंगळवारी आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन अभिनंदन केले, तर आमदार प्रशांत ठाकूर यांनीही बिनेदार यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी श्याम साळवी, श्रीशेठ भंडारी, अमोल जाधव, ॲड. शिवकुमार कांबळे, ॲड.अक्षय मिसाळ, यश बिनेदार, स्वाती बिनेदार, जिज्ञासा बिनेदार, कुसुम भोजने, रेखा खंडीझोड, सुप्रिया भोजने, ममता गमरे, रसिका भोजने, संतोष म्हस्के, प्रकाश सोनावळे, उत्तम भंडारी, प्रथमेश भंडारे, साईनाथ भटकल, आदिनाथ बोरुडे, मानस मोहिते, सुरज पिल्लई उपस्थित होते.**







**पनवेल : येथील महापालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक नितीन पाटील, राजू सोनी आणि सुमित झुंझारराव यांचे अभिनंदन करताना जयेश सोनेटा, नाट्य निर्माते दीपक मिराणी, गणेश भगत, सोशल मीडिया हेड प्रसाद हनुमंते, लेखक दिग्दर्शक संकेत गायकवाड.**

## संपादकीय

# ‘नबीन’ पर्व

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नितीन नबीन यांची बिनविरोध निवड झाली आहे. ते भाजपचे बारावे राष्ट्रीय अध्यक्ष असून या पदावर विराजमान होणारे ते आतापर्यंतचे सर्वात तरूण अध्यक्ष आहेत.

**वयाने लहान असले तरी नितीन नबीन हे अनुभवी पक्षसंघटक आहेत. आतापर्यंत त्यांनी पाच वेळा विधानसभा निवडणूक जिंकली आहे. सर्व समाजघटकांशी उत्तम संबंध हे त्यांचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते. भारतीय जनता पक्षाच्या दिल्लीतील मुख्य कार्यालयात अधिकृत घोषणा करण्यात आल्यानंतर नितीन नबीन यांनी मंगळवारी भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह पक्षातील अन्य नेते उपस्थित होते. नितीन नबीन यांचा जन्म २३ मे १९८० रोजी बिहारमध्ये झाला. आजवरचे भाजपचे सर्वात तरूण पक्षाध्यक्ष ठरलेले नितीन नबीन हे ४५ वर्षांचे आहेत. बिहार हे कार्यक्षेत्र असलेल्या नबीन यांची थेट भाजपच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर राजकीय क्षेत्रात आश्चर्य व्यक्त केले गेले. परंतु चाकोरीबाहेरचे निर्णय घेणे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यशैलीचे कायमच वैशिष्ट्य राहिले आहे. परंतु त्यांचे असे सर्व निर्णय आजवर यशस्वीच ठरले आहेत. भाजपची स्थापना झाली तेव्हा नितीन नबीन यांचा जन्मही झाला नव्हता. भारतीय जनता पक्षाचा जन्म ६ एप्रिल १९८०चा तर नितीन नबीन यांचा जन्म २३ मे १९८०चा. नितीन नबीन हे भाजपच्या मागील पिढीतील नेते व माजी आमदार नबीन किशोर प्रसाद सिन्हा यांचे पुत्र असून वडिलांच्या निधनानंतर नितीन नबीन यांनी बांकीपूर येथून निवडणूक लढवली आणि ते आमदार झाले. अनेक वर्षे ते बिहारमध्ये मंत्री राहिले असून अनेक विभागांच्या कामाचा अनुभव त्यांच्या गाठीशी आहे. पक्षाने सोपवलेल्या संघटनात्मक जबाबदाऱ्याही त्यांनी यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. २०२३मध्ये त्यांची नियुक्ती छत्तीसगडचे प्रभारी म्हणून करण्यात आली होती. तेथे त्यांनी कॉंग्रेसचे भूपेश बघेल सरकार निवडणुकीत पाडून दाखवले व आपले संघटन कौशल्य सिद्ध केले. २०२४च्या लोकसभा निवडणुकीतही त्यांनी छत्तीसगडच्या प्रभारीपदी राहून भाजपला ११ पैकी १० जागांवर यशस्वी होण्यास हातभार लावला. नितीन नबीन वयाने लहान असले तरी आता त्यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने पक्षाचे कार्यकर्ते आणि नेत्यांना त्यांच्या नेतृत्वाचा स्वीकार करून काम करावे लागेल. स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच तसा संदेश आपल्या उद्गारांतून दिला आहे. जेव्हा पक्षाचा विषय असतो तेव्हा मी सुद्धा एक कार्यकर्ता आहे आणि नितीन नबीन माझे बॉस आणि आपल्या सर्वांचे अध्यक्ष आहेत असे प्रतिपादन करून पंतप्रधानांनी पक्षशिस्तीचे महत्त्वच अधोरेखित केले आहे. भारतीय जनता पक्ष हा सातत्याने पक्षसंघटन मजबूत करण्यात गुंतलेला पक्ष आहे. पुढची पंचवीस वर्षे भाजपकरिता आणि केंद्रातील भाजप सरकारसाठी किती महत्त्वाची आहेत याचा उल्लेख पंतप्रधान मोदी यांनी यापूर्वीही अनेकदा केला आहेच. त्यामुळे नबीन यांनाही लगेच जोमाने कामाला लागावे लागेल. नबीन यांचा उल्लेख सातत्याने ‘मिलेनियल’ पिढीचे प्रतिनिधित्व करणारे पक्षाध्यक्ष असा होतो आहे. पक्षातील वयाने ज्येष्ठ असलेल्या नेत्यांचे मार्गदर्शन त्यांना लाभत राहीलच. तसेच आता महत्त्वाच्या गणल्या जाणाऱ्या ‘जेन झी’ व त्या पुढील पिढ्यांनाही नबीन यांना भारतीय जनता पक्षाशी जोडावे लागेल. त्या अर्थाने भाजपचेही एक ‘नबीन’ पर्वच आता सुरू होत आहे असे म्हणता येईल.**

# चित्रपट दिग्दर्शक, कवी व लेखक शांताराम आठवले

शांताराम आठवले हे मराठी चित्रपट दिग्दर्शक, लेखक, गीतकार होते. त्यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया या लेखातून त्यांच्याविषयी...

शांताराम गोविंद आठवले यांचे वडील सरदार शितोळे यांच्या पुण्याकडील जहागिरीची व्यवस्था पाहत असत. कसबा पेठेतील त्यांच्या वाड्यातच शांताराम यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांना नाटकाचा व गाण्याचा शौक होता. शितोळे यांच्या वाड्यातील दिवाणखान्यात तमाशाचे फड कडकडत, बैठकी रंगत, शाहिरांच्या हजेऱ्या लागत. हे सारे शांताराम आठवले यांना लहानपणीच पहायला मिळाले. तो काळ मराठी नाटकाच्या वैभवाचा काळ होता. त्यांनी बहुतेक सारी चांगली नाटके पाहिली. त्यातूनच त्यांचा कलावंताचा पिंड हळूहळू घडत गेला.

भावे स्कूलमधील शिक्षकांनी शांताराम यांची कलात्मक अभिरुची अधिक डोळस केली. याच शाळेत त्यांना कविवर्य माधव ज्युलियन यांच्या अध्यापनाचा लाभ घडला. पण आठवले यांची काव्यवृत्ती खरी फुलवली ती प्रा. वा. भा. पाठक यांनी. मराठीसोबतच प्रा. किंकर यांनी इंग्रजी काव्याचीही त्यांना गोडी लावली. त्यांनीच शांताराम आठवले यांच्या कविता प्रथम प्रकाशात आणल्या.



शांताराम १९३० साली मॅट्रिक झाले. कौटुंबिक अडचणींमुळे त्यांनी पहिल्या वर्षातच महाविद्यालय सोडले. प्रसिद्ध लेखक ना. ह. आपटे यांचे ‘पहाटेपूर्वीचा काळोख’ हे पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्याने प्रभावित होऊन शांताराम त्यांना भेटायला कोरेगावला गेले, तेथे त्यांच्या सहवासात काही काळ राहिले.

याच सुमारास ‘प्रभात फिल्म कंपनी’ कोल्हापूरहून पुण्यास आली होती व ना. ह. आपटे यांच्या कथेवरून ‘अमृतमंथन’ हा चित्रपट काढायची बोलणी सुरू होती. आपटे यांनी शांताराम आठवले यांचे साहित्यगुण पारखले होते. त्यांनीच शांतारामबापूंकडे आठवल्यांच्या नावाची शिफारस केली. आपटे यांच्याच प्रेरणेने आठवल्यांनी ‘प्रभात’मध्ये पदार्पण केले. प्रभातमध्ये तीस रुपये पगारावर पद्यलेखक म्हणून त्यांची नेमणूक झाली. सुरूवातीला पद्यलेखनाबरोबरच चित्रीकरणास साहाय्यक म्हणून पडणारी सर्व कामे ते करत असत. शिवाय प्रभातच्या प्रसिद्धीचे व त्यानिमित्त करावे लागणारे सर्व लेखन करण्याची जबाबदारीही आठवले यांच्यावर होती.

‘अमृतमंथन’ या चित्रपटापासून शांताराम आठवले यांनी प्रभातच्या अनेक चित्रपटांचे गीतलेखन केले. त्यांनी लिहिलेली ‘अहा भारत विराजे’, ‘भारती सृष्टीचे सौंदर्य’, ‘उसळत तेज भरे’, ‘हासत वसंत ये वनी’, ‘राधिका चतुर बोले’, ‘लखलख चंदेरी’, ‘दोन घडीचा डाव’ ही सारी गीते प्रासादिक, नादमधुर व अर्थपूर्ण होती. आपल्या पद्यरचनेने शांताराम आठवले यांनी पद्यरचनेचा श्रेष्ठ आदर्श घालून दिला.

आठवले यांनी लिहिलेल्या ‘आधी बीज एकले’ या ‘संत तुकाराम’मधील अभंगाला तुकारामाची प्रतिष्ठा आणि पावित्र्य लाभले. संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक ह.भ.प. पांगारकर यांनी हा अभंग ऐकला. तुकारामांचा हा अभंग आपल्या दृष्टीतून कसा सुटला, याचे आश्चर्य वाटून त्यांनी तुकारामाची गाथा पुन्हा धुंडाळली, या पांगारकर यांच्या कृतीतच आठवले यांच्या काव्यप्रतिभेचे वैशिष्ट्य अधोरेखित होते. प्रभातमध्ये आठवले १९३४ ते १९४३ अशी नऊ वर्षे होते. नंतर ते दिग्दर्शनाकडे वळले. शांतारामबापूंबरोबर काम करताना त्यांनी दिग्दर्शनातील बारकावे व वैशिष्ट्ये आत्मसात केली. आठवले यांनी १९४८ साली ‘भाग्यरेखा’ हा चित्रपट निर्माण व दिग्दर्शित केला. त्यानंतर त्यांनी ‘मै अबला नहीं’, ‘वहिनीच्या बांगड्या’, ‘संसार करायचाय मला’, ‘शेवग्याच्या शेंगा’, ‘पडदा’ असे अनेक चित्रपट दिग्दर्शित केले. १९५९ मध्ये भारत सरकारच्या ‘फिल्म्स डिव्हिजन’मध्ये दिग्दर्शक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. तिथे त्यांनी अनेक अनुबोधपटांचे दिग्दर्शन केले.

‘एकले बीज’ व ‘बीजांकुर’ हे काव्यसंग्रह व ‘प्रभातकाल’ हे ‘प्रभात’मध्ये असतानाच्या काळात लिहिलेले त्यांचे आत्मकथन प्रसिद्ध आहे. त्यांना १९६५ सालच्या ‘वावटळ’ चित्रपटासाठी उत्कृष्ट दिग्दर्शनाचे महाराष्ट्र शासनाचे प्रथम पारितोषिक मिळाले. त्यांचा ‘ज्ञानेश्वरी’चा व ‘ज्योतिषशास्त्रा’चा अभ्यास दांडगा होता. आध्यात्मिक वृत्तीने ते निवृत्तीचे जीवन जगत होते.

**–मधू पोतदार**

# कवी, लेखक माधव ज्यूलियन

माधव ज्यूलियन हे मराठी भाषेतील अग्रणी कवी, रविकिरण मंडळाचे संस्थापक आणि सर्वांत यशस्वी सदस्य होते तसेच ते फारसी आणि इंग्रजी विषयाचे प्राध्यापकसुद्धा होते. मुंबई विद्यापीठाच्या मराठी साहित्यातील देशभरातील पहिल्या-वहिल्या डी. लिट. पदवीचे ते मानकरी आहेत. २९ नोव्हेंबर रोजी त्यांचा स्मृतिदिन. २१ जानेवारी १८९४ रोजी बडोदा येथे डॉ. माधव त्र्यंबक पटवर्धन उर्फ माधव ज्यूलियन यांचा जन्म झाला.

कवी माधव यांनी पटवर्धनऐवजी ज्यूलियन नाव लावण्यामागे दोन आख्यायिका ऐकायला मिळतात. इंग्लिश कवी शेले याने रचलेल्या ज्यूलियन आणि मडालो या कवितेवरून त्यांनी ज्यूलियन असे टोपणनाव धारण केले. याशिवाय ‘गॉड्ज गुड मेन’ या कादंबरीतील नायिका ज्यूलियन या व्यक्तिरेखेवरून माधवरावांनी ज्यूलियन हे नाव घेतले, असेही सांगितले जाते.

१९१६मध्ये माधव पटवर्धन यांनी फारसी भाषा हा विशेष विषय निवडून बीएची पदवी मिळवली. त्यानंतर १९१८ मध्ये इंग्रजी साहित्य या विषयात त्यांनी एमएचा पदव्युत्तर अभ्यास पूर्ण केला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर १९१८ ते १९२४ या कालावधीत ते फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथे फारसी भाषा शिकवू लागले. त्यानंतर कोल्हापूरमधील राजाराम महाविद्यालयात ते फारसी भाषेचे प्राध्यापक म्हणून रूजू झाले. १९२५ ते १९३९ या कालावधीत त्यांनी तेथे अध्यापनाचे कार्य केले. दरम्यान, १ डिसेंबर १९३८ रोजी माधव त्र्यंबक पटवर्धन यांना त्यांच्या ‘छंदोरचना’ या ग्रंथासाठी मुंबई विद्यापीठाने डी.लिट. ही पदवी देत कवी माधव ज्यूलियन यांचा सन्मान केला.



गझल आणि रुबाई हे काव्यप्रकार फारसीमधून मराठीत आणण्याचे श्रेय कवी माधव ज्यूलियन यांना दिले जाते. माधव ज्यूलियन यांनी ‘दित्जू’, ‘मा.जू’ आणि ‘एम. ज्यूलियन’ या नावानेसुद्धा लेखन केले आहे. यापैकी काही लिखाण त्यांनी इंग्रजीमध्ये केले आहे. एवढेच नाही तर कविवर्य भा. रा. तांबे यांच्या कवितांचे संकलन आणि संपादनसुद्धा माधव ज्यूलियन यांनी केले. उत्कृष्ट संपादनाचा एक नमुना म्हणून याकडे पाहिले जाते. कवितांशिवाय माधव ज्यूलियन यांनी भाषाशास्त्रीय लेखनसुद्धा केले. ते नेहमीच सोप्या व शुद्ध मराठीचा पुरस्कार करत आणि म्हणूनच त्यांनी भाषाशुद्धी–विवेक हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथात कालबाह्य ठरलेल्या शेकडो मराठी शब्दांची सूची समाविष्ट करण्यात आली आहे. त्यांच्या एकूण प्रकाशित साहित्यामध्ये स्फुट गझला, खंडकाव्य, दीर्घकाव्य, काव्यसंग्रह, अनुवादित लेख, संशोधनात्मक व भाषांतरीत वाङ्मय प्रकारांचासुद्धा समावेश आहे. त्यांच्या प्रकाशित कवितांपैकी ’कशासाठी पोटासाठी’, ’जीव तुला लोभला माझ्यावरी’, ‘प्रेम कोणीही करीना’, ‘प्रेमस्वरूप आई’, ‘मराठी असे आमुची मायबोली’ या कविता खूपच प्रसिद्ध आहेत. १९३३ साली नाशिक येथे पार पडलेल्या कविसंमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषवले होते, तर १९३४ रोजी बडोदे येथे झालेल्या साहित्य संमेलनात ते कविशाखेचे अध्यक्ष होते. १९३६मध्ये जळगाव येथे आयोजित मराठी साहित्य संमेलनाचेसुद्धा कवी माधव ज्यूलियन यांनी अध्यक्षपद भूषवले होते.

इ.स. १९३३मध्ये नाशिक येथे झालेल्या कविसंमेलनाचे माधव ज्युलियन यांनी अध्यक्षपद स्वीकारले होते. इ.स. १९३४मध्ये बडोदे येथे झालेल्या साहित्यसंमेलनात ते कविशाखेचे अध्यक्ष होते. इ.स. १९३६मध्ये जळगाव येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. पुण्यातील टिळक रोडवरील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहाला माधवराव पटवर्धन सभागृह असे नाव देण्यात आले आहे.

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# लॅपटॉपचा कीबोर्ड बंद झाल्यास 'हे' उपाय करा

लॅपटॉपच्या कीबोर्डने साथ सोडली की आपली मोठी फजिती होते. अनेकदा सॉफ्टवेअरमधील किरकोळ बिघाड किंवा चुकीच्या सेटिंगमुळेही कीबोर्ड रिस्पॉन्स देणं बंद करतो. टेक्नीशियनकडे जाऊन खिशातले पैसे रिकामे करण्यापूर्वी घरातल्या घरात ’या’ ट्रिक्स वापरून पहा.



✻ सिस्टिम एकदा ’रीस्टार्ट’ करून पहा : हे ऐकायला अतिशय साधे वाटत असले तरी, लॅपटॉपच्या अनेक समस्यांवर हा रामबाण उपाय आहे. लॅपटॉप बराच काळ चालू राहिल्यामुळे किंवा एखादे ॲप क्रॅश झाल्यामुळे कीबोर्ड ड्रायव्हर अडकू शकतो. लॅपटॉप रीस्टार्ट केल्यावर सॉफ्टवेअर पुन्हा नव्याने लोड होते आणि कीबोर्ड व्यवस्थित चालू होऊ शकतो.

✻ सेटिंग्जमध्ये ’फिल्टर कीज’ तपासा : अनेकदा आपल्याकडून चुकून काही शॉर्टकट कीज दाबल्या जातात, ज्यामुळे ’Filter Keys’ सारखे क्सेसिबिलिटी फीचर्स ऑन होतात. यामुळे कीबोर्ड लॉक होतो किंवा टाईप करताना विलंब होतो. लॅपटॉपच्या सेटिंग्समध्ये जाऊन कीबोर्ड लॉक तर नाही ना, हे तपासा.

✻ ड्रायव्हर अपडेट किंवा री–इन्स्टॉल करा : जर कीबोर्डचे ड्रायव्हर्स जुने झाले असतील किंवा करप्ट झाले असतील, तरीही कीबोर्ड चालत नाही. अशा वेळी ’Device Manager’ मध्ये जाऊन कीबोर्ड ड्रायव्हर अपडेट करा. किंवा एकदा अन–इन्स्टॉल करून लॅपटॉप रीस्टार्ट करा. रीस्टार्ट केल्यावर सिस्टिम आपोआप योग्य ड्रायव्हर पुन्हा इन्स्टॉल करते, ज्यामुळे तांत्रिक बिघाड दूर होतो.

✻ बाहेरील कीबोर्ड जोडून टेस्ट करा : तुमच्याकडे एखादा USB किंवा ब्लूटूथ कीबोर्ड असेल, तर तो लॅपटॉपला जोडून पहा. जर बाहेरून जोडलेला कीबोर्ड नीट चालत असेल, तर याचा अर्थ लॅपटॉपच्या सॉफ्टवेअरमध्ये प्रॉब्लेम नसून इंटरनल हार्डवेअरमध्ये बिघाड आहे.

✻ धूळ आणि कचरा साफ करा : लॅपटॉपच्या बटणांमध्ये धूळ, कचरा किंवा अन्नाचे कण अडकले तरी कीबोर्ड नीट चालत नाही. लॅपटॉप हलक्या हाताने उलटा करून झटकून पहा किंवा ब्रशने बटणांच्या कडा साफ करा. जर सगळे उपाय करूनही कीबोर्ड चालत नसेल, तर मात्र हार्डवेअरमध्ये गंभीर समस्या असू शकते. अशा वेळी स्वतः प्रयोग न करता अधिकृत सर्व्हिस सेंटरला दाखवणेच योग्य ठरेल.

# कादंबरीकार समीक्षक वा.म. जोशी

मराठी कादंबरीकार, साहित्यसमीक्षक आणि तत्त्वचिंतक. जन्म कुलाबा जिल्ह्यातील तळा या गावी २१ जानेवारी १८८२ रोजी झाला. पुण्याच्या डेक्कन कॉलेजातून तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्र हे विषय घेऊन एमए झाले (१९०६). त्यानंतर वि. गो. विजापूरकर यांनी कोल्हापूर येथे राष्ट्रीय शिक्षण योजनेखाली चालविलेल्या समर्थ विद्यालयात अध्यापनाचे काम केले. वामन मल्हार जोशी यांचा आज स्मृतीदिन आहे.

विजापूरकरांच्या बरोबर विश्ववृत या मासिकाच्या संपादनाची जबाबदारीही स्वीकारली. याच मासिकात १९०८ साली प्रसिद्ध झालेल्या ‘वैदिक धर्माची तेजस्विता’ या लेखाबद्दल राजद्रोहाचा आरोप येऊन त्यांना आणि विजापूरकरांना दंडाची व तीन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा झाली. तुरुंगातून सुटल्यानंतर (१९११) पाच वर्षे केसरी–मराठा संस्थेत त्यांनी काम केले. त्यानंतर काही काळ अच्युत बळवंत कोल्हटकर ह्यांच्या मेसेज या इंग्रजी दैनिकाचे ते उपसंपादक होते. पुढे महर्षी कर्वे यांच्या हिंगणे येथील पाठशाळेत प्राध्यापक म्हणून ते दाखल झाले (१९१८) व सेवानिवृत्तीपर्यंत त्याच संस्थेत वेगवेगळ्या पदांवर काम करीत राहिले.

रागिणी अथवा काव्यशास्त्रविनोद (दुसरी आवृ. १९१५) या त्यांच्या पहिल्याच कादंबरीमुळे त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले.



निमित्त


त्यानंतर आश्रमहरिणी (१९१६), नलिनी (१९२०), सुशिलेचा देव (१९३०), इंदु काळे व सरला भोळे (१९३४) या चार कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. वाचकाचे मनोरंजन करण्यापेक्षा त्याला विचार करावयास लावण्यासाठी त्यांचे कादंबरीलेखन मुख्यतः झालेले आहे. त्यातून त्यांची तत्त्वचिंतक वृत्ती प्रकर्षाने व्यक्त होते. कर्तव्य आणि ध्येयनिष्ठा; कलाप्रेम आणि नीतिबंधने; बुद्धी आणि श्रद्धा; व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामजिक–नैतिक बंधने यांसारखे जीवनविषयक मौलिक प्रश्न त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून उपस्थित केले. त्यांच्याच दृष्टीने ‘नकटी’ ठरणारी नलिनीसारखी कादंबरीही ह्यास अपवाद नाही. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी मराठीतील तात्त्विक कादंबरीच्या जनकत्वाचा मान त्यांना दिला आहे.

कादंबऱ्याप्रमाणेच त्यांच्या अन्य लेखनालाही एक लक्षणीय वैचारीक बैठक आहे. राष्ट्रवाद, गांधीवाद, समाजवाद, मार्क्सवाद इ. प्रभावी विचारप्रणालींच्या ऐन उत्कर्षाच्या काळात त्यांचे लेखन झाले. तथापि ह्या सर्वच वादांच्या बाबतींत त्यांची भूमिका सदैव डोळस मध्यममार्गीयाचीच राहिली. त्यांचे साहित्यसमीक्षात्मक लेखन थोडेच असले, तरी त्यातून साहित्यविषयक मूलभूत प्रश्न उपस्थित करून त्यांची सोडवणूक कोणत्या दृष्टीने करावी याचे अचूक मार्गदर्शन त्यांनी केले आहे. म्हणूनच वामन मल्हार जोशी ह्या नावाला साहित्याच्या क्षेत्रात तात्यासाहेब केळकर व श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्या नावांइतकेच महत्व प्राप्त झाले.

उपर्युक्त लेखनाखेरीज नवपुष्पकरंडक (१९१६, विविधस्वरूपी लेखनाचा संग्रह), विस्तवाशीं खेळ (१९३७–नाटक) व स्मृतीलहरी (१९४२) ही त्यांची तीन पुस्तके उल्लेखनीय आहेत. त्यांच्या ठिकाणी तत्त्वशोधक वृत्तीबरोबरच प्रसन्न विनोदबुद्धी होती. तिचा प्रत्यय त्यांच्या सर्वच लेखनातून–नीतिशास्त्रप्रवेश (१९१९) ह्या प्रबंधात्मक ग्रंथातूनही येतो. मडगाव येथे १९३० साली झालेल्या पंधराव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. मुंबई येथे २० जुलै १९४३ रोजी ते निधन पावले.

(साभार : विकासपीडिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# कॉफी पिण्यासाठी ‘ही’ आहे ‘सर्वोत्तम वेळ’; वाचा फायदे



कॉफी पिण्याची योग्य वेळ कोणती? कॉफीचे जास्तीत जास्त फायदे आपल्याला कधी मिळू शकतात? असा प्रश्न अनेकांना नेहमीच पडतो. सकाळी, संध्याकाळी की रात्री नक्की कधी कॉफी पिणे चांगलं आहे हे जाणून घेऊया. अनेकदा असं दिसून येतं की, लोक सकाळी उठताच उपाशीपोटी एक कप चहा किंवा कॉफी पितात. त्यांच्या दिवसाची सुरुवात कॉफीने होते.

उपाशीपोटी चहा किंवा कॉफी प्यायल्याने पोटात ॲसिड रिफ्लक्स होतं आणि त्यामुळे ॲसिडिटीची समस्या देखील वाढू शकते तसेच याचा पचनसंस्थेवरही वाईट परिणाम होतो. तज्ज्ञांच्या मते, एका कप कॉफीमध्ये सुमारे १०० मिलीग्राम कॅफिन असतं, ते कॉफीच्या प्रकारावर देखील अवलंबून असतं. जेव्हा तुम्ही सकाळी उपाशीपोटी कॉफी पिता तेव्हा शरीरात कोर्टिसोलची लेव्हल वाढते आणि तुम्हाला अधिक ताण जाणवू शकतो.

दुसरीकडे, रात्री कॉफी प्यायल्याने तुमच्या झोपेवर परिणाम होऊ शकतो, त्याचा तुमच्या मेटाबॉलिज्मवर परिणाम होतो. अशा परिस्थितीत तज्ज्ञांच्या मते, कॉफी पिण्याची योग्य वेळ सकाळी ९:३० ते ११:०० दरम्यान असते, जेव्हा तुम्ही कॉफी पिण्याचे जास्तीत जास्त फायदे मिळवू शकता. यावेळी कोर्टिसोलची पातळी कमी असते आणि कॅफिनचा शरीरावर होणारा परिणाम कमी असतो. जर तुम्हाला दुपारचा थकवा दूर करण्यासाठी तुम्ही दुपारी २–३च्या दरम्यान एक कप कॉफी देखील पिऊ शकता.

आपण एका दिवसात किती कॉफी पिऊ शकतो? असाही प्रश्न अनेकांना पडतो. एफडीआयनुसार, एका दिवसात ४०० मिलीग्रामपेक्षा जास्त कॅफिनचं सेवन करू नये. त्याच वेळी महिलांनी गर्भधारणेदरम्यान फक्त २०० मिलीग्राम कॅफिनचं सेवन करावं. हे कॅफिन केवळ कॉफीमधूनच नाही तर चहा, चॉकलेट, सोडा, एनर्जी ड्रिंक्स आणि इतर उत्पादनांमधून देखील मिळतं. अशा परिस्थितीत तुम्ही दिवसातून एक ते दोन कप कॉफी पिऊ शकता.

# कोट्यवधींच्या जलवाहिनी प्रकल्पानंतरही श्रीवर्धनकरांना पाण्यासाठी वणवण

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगर परिषदेच्या हद्दीत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर बनत चालला असून, कोट्यवधी रुपये खर्चून राबविण्यात आलेला जलवाहिनी व जलशुद्धीकरण प्रकल्प नागरिकांसाठी दिलासा ठरण्याऐवजी डोकेदुखी ठरत असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. सतत होणाऱ्या पाइपलाईन फुटींमुळे संपूर्ण शहराला महिन्यात तीन-चार वेळा दोन ते चार दिवस पाण्याविना राहावे लागत असून, नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

श्रीवर्धन शहरासह रानवली, निगडी, बापवन व गालसुरे परिसराचा पाणीपुरवठा रानवली लघु पाटबंधारे योजनेवर अवलंबून आहे. १९७७ साली उभारलेल्या रानवली धरणावर आधारित या योजनेअंतर्गत सुमारे २,५७० घरांना नळजोडणी देण्यात आली आहे. २०२२-२३ मध्ये सुमारे २३ कोटी रुपये खर्चून जलशुद्धीकरण प्रकल्प व नवीन कञ्झए जलवाहिन्या टाकण्यात आल्या. २०२३ मध्ये मोठ्या थाटामाटात लोकार्पणही झाले. मात्र अवघ्या काही महिन्यांतच या प्रकल्पाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रानवली ते श्रीवर्धन या सुमारे ८ किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्यांमध्ये वारंवार फुटी होत आहेत. एकदा पाइप फुटली की दुरुस्तीसाठी किमान दोन



ते तीन दिवस जात असून, या काळात संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा ठप्प होतो. पावसाळ्यात गढूळ पाणी, कमी दाबाने होणारा पुरवठा, तसेच अचानक पाणी बंद होणे, या तक्रारी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत.

नागरिकांचा ठाम आरोप आहे की जलवाहिन्या बदलण्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून करण्यात आले आहे. पाइप टाकताना आवश्यक खोली न राखणे, जॉइंट योग्य पद्धतीने न बसवणे, तसेच माती भराव व दाबणी (कॉम्पॅक्शन) नीट न केल्यामुळेच पाइपलाईन वारंवार फुटत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे या कामाचे संपूर्ण देयक ठेकेदाराला अदा करण्यात आल्याची चर्चा असून, त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

नगरपरिषदेकडून नागरिकांना 'पाणी वाचवा' असे आवाहन केले जात असताना, दुसरीकडे फुटलेल्या जलवाहिन्यांमधून हजारो लिटर पाणी रस्त्यावर वाया जात असल्याचे चित्र रोज दिसून येत आहे. ही सार्वजनिक मालमत्तेची उघडपणे होणारी नासधूस असून, याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

या संपूर्ण प्रकरणात जर भ्रष्टाचार, संगनमत, किंवा शासकीय निधीच्या गैरवापराचा संशय खरा ठरला, तर संबंधित ठेकेदार, अभियंते व जबाबदार अधिकाऱ्यांवर भादंवि व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार फौजदारी गुन्हे दाखल करून सखोल चौकशी करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. केवळ चौकशी समिती नेमून वेळकाढूपणा न करता, तांत्रिक ऑडिट, दर्जा चाचणी (थर्ड पार्टी इन्स्पेक्शन) व आर्थिक लेखापरीक्षण करण्यात यावे, अशीही मागणी पुढे येत आहे.

श्रीवर्धनकरांना शुद्ध, फिल्टरयुक्त व मुबलक पाणी मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात नागरिकांना सतत पाण्यासाठी वनवन करावी लागत असून, हा प्रश्न आता केवळ असुविधेचा न राहता लोकांच्या आरोग्य व मूलभूत हक्कांशी संबंधित गंभीर विषय बनला आहे.

या पार्श्वभूमीवर खासदार सुनील तटकरे तसेच महिला व बालविकास मंत्री आदितीताई तटकरे यांनी या संपूर्ण प्रकरणात तातडीने लक्ष घालून, दोषींवर कठोर कारवाई करत श्रीवर्धनच्या पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी अपेक्षा श्रीवर्धनवासीयांकडून व्यक्त केली जात आहे. अन्यथा येत्या काळात हा प्रश्न अधिक तीव्र स्वरूप धारण करण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

**श्रीवर्धनमधील जलवाहिनी व जलशुद्धीकरण प्रकल्प हे प्रशासकीय प्रक्रियेतूनच राबविण्यात आले असून, त्याच्या अंमलबजावणीत आढळणाऱ्या त्रुटी गंभीर आहेत. वारंवार होणाऱ्या पाइप फुटींमुळे नागरिकांच्या मूलभूत पिण्याच्या पाण्याच्या हक्कावर परिणाम होत आहे. या प्रकरणात निकृष्ट काम, दुर्लक्ष किंवा आर्थिक अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. तांत्रिक ऑडिट व आर्थिक चौकशी करण्यासाठी वरिष्ठ स्तरावर प्रस्ताव सादर केला जाईल. दोषी आढळणाऱ्यांची गय केली जाणार नाही. श्रीवर्धनकरांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा देणे ही नगरपरिषदेची सर्वोच्च जबाबदारी आहे.**

**-ॲड. अतुल चौगुले, नगराध्यक्ष, श्रीवर्धन नगरपालिका**

## अष्टमीतील प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावणार -नगराध्यक्ष शेडगे

**रोहे : प्रतिनिधी**

खासदार सुनिल तटकरे व मंत्री अदिती तटकरे यांच्या सहकार्याने नगर पालिका हद्दीतील अष्टमी वरचा मोहल्ला कबरस्थानातील वजुखाना इमारतीचे काम मागील वर्षभरापासून प्रलंबीत आहे. सदर प्रलंबीत काम तातडीने मार्गी लावणार असे आश्वासन रोहा अष्टमी नगर पालिकेच्या नगराध्यक्षा कु. वनश्री समीर शेडगे यांनी दिले. नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी अष्टमी गावातील उर्दू शाळेला भेट दिली. या दरम्यान उर्दू शाळेकरिता रंगमंच तसेच खालचा मोहल्ला येथील प्रलंबीत व्यायाम शाळेचा काम तातडीने पूर्ण करणार असल्याचे त्या म्हणाल्या. या दरम्यान त्यांनी ठिकठिकाणी भेटी देऊन कामांची पाहणी केली.

सोमवारी ( ता.१९ ) सायंकाळी केलेल्या पाहणी दरम्यान उपाध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके,स्थानिक नगरसेवक राजेंद्र जैन,प्रशांत कडू, नगरसेविका फरहा पानसरे,निता हजारे,अभियंता सुधीर भगत,ओंकार भुरण,मुस्लिम समाज अध्यक्ष शफी पानसरे,वरचा मोहल्ला कमटी अध्यक्ष शहनवाज नागोठकर,उपाध्यक्ष हाफिज जलील म्हैसकर, सचिव मोअज्ञम नाडकर, सदस्य इस्माईल महाडिक, माजी अध्यक्ष बाकर साष्टीकर,इम्तियाज दर्जी,यासिन पानसरे,मजीद पठाण,राहील नागोठकर,अकिब येरुणकर,फरहान पानसरे, रोहित हजारे आदी मोहल्ला विभागातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महाडमध्ये समतादूतांची दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा

**अलिबाग : रामप्रहर वृत**

बार्टीचे समतादूत हे संपूर्ण राज्यात शासनाच्या तसेच सामाजिक न्याय विभाग व बार्टीच्या विविध योजनाचा प्रसार व प्रचार करण्याचे महत्त्वपूर्ण काम करतात. शासनाच्या योजनांचा लाभ वंचित घटकापर्यंत पोहोचण्यासाठी समतादुतांना समतादूत पचा मोठा फायदा होईल.समतादूत हे शासनाचे मजबूत पाईक आहेत, त्यांनी शासनाच्या विकास प्रक्रियेचे वाहक व्हावे, असे आवाहान सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी,पुणे संस्थेच्या वतीने दिनांक १९ व २० जानेवारी २०२६ रोजी समतादूत व प्रकल्प अधिकारी यांची दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा क्रांतीभूमी महाड , जिल्हा रायगड येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथे आयोजित करण्यात आली या कार्यशाळेचे दुरुस्तथ प्रणालीद्वारे उद्घाटन डॉ. कांबळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते



बोलत होते.

यावेळी बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे, विस्तार व सेवा विभागाचे विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड, लेखाधिकारी नितीन चव्हाण, सहाय्यक लेखाधिकारी उल्हास शिंदे आदी उपस्थित होते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्यास मा. महासंचालक सुनील वारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना डॉ. कांबळे म्हणाले, सामाजिक न्याय विभाग शासनाच्या १७ विभागांना योजनांसाठी निधी देत असतो. या सर्व योजनांचा प्रचार -प्रसार समदुतांनी करावा. शासनाच्या विकास योजनेच्या प्रक्रियेत समतादुतांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. या प्रक्रियेत हिरीरीने सहभाग घेऊन आपल्या कामाचा कामाचा ठसा उंचवावा असे,आवाहानही त्यांनी केले.

कार्यशाळेला संबोधित करताना महासंचालक सुनील वारे म्हणाले की, महाड ही क्रांतिकारी भूमी असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी याच क्रांतीभूमीत चवदार तळ्याचा सत्याग्रह करून समता प्रस्थापित केली. तो लढा आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.

समतादूत हे गेल्या अनेक वर्षांपासून शासनाच्या व सामाजिक न्याय विभागाच्या तसेच बार्टीच्या विविध योजनांचा प्रसार आणि प्रचार करतात. समतादूतांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देऊ. समतादुतांनी बदलत्या काळानुसार आपल्यात बदल केला पाहिजे. नवे ज्ञान, नवे कौशल्य विकसित केले पाहिजे असेही ते म्हणाले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना विस्तार व सेवा विभागाचे विभाग प्रमुख डॉ बबन जोगदंड यांनी सर्व राज्यातील प्रत्येक तालुक्यात आपले समतादूत चांगले काम करत असून समतादूतांच्या कामात गतिशीलता येण्यासाठी महाड येथे दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केल्याचे सांगितले तसेच उल्लेखनीय काम करणाऱ्या समतादूत आणि प्रकल्प अधिकाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करणार असल्याचे सांगितले. समतादूत प्रकल्पाचे गतीने काम करण्यासाठी नवतंत्रज्ञानाचा समतादुतांनी वापर करवा, असे आवाहनही त्यानी केले.

# एकसंध ग्रामस्थांमुळे कोल्हारे येथील अखंड हरिनाम सोहळा लोकप्रिय

**कर्जत : प्रतिनिधी**

कोल्हारे गावातील वारकऱ्यांना स्थानिक तरुणांनी दिलेले पाठबळ महत्वाचे असून ग्रामस्थांच्या एकीच्या बळामुळे या गावातील अखंड हरिनाम सोहळा यशस्वी होत असतो. ग्रामस्थांच्या एकीचा आदर्श आजुबाजूच्या ग्रामस्थांनी समजून घ्यायलं हवा.'असे आवाहन चाफेवाडी स्थित मठाधिपती हभप देहू महाराज मेंगाळ यांनी केले.

कर्जत तालुक्यातील कोल्हारे येथील श्री विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ आणि ग्रामस्थ मंडळ यांच्या माध्यमातून दीड दिवसांचा अखंड हरिनाम सोहळा आयोजित करण्यात आला होता.



श्री विठ्ठल रखुमाई मंदिराचे समोर आयोजित केलेल्या अखंड हरिनाम सोहळा मध्ये दीपोत्सवाचे आयोजन केले होते.या दीपोत्सव सोहळ्याला ह.भ.प. देहू महाराज मेंगाळ, प्रवचनकार रमेश महाराज श्रीखंडे, कर्जत तालुका आगरी समाज संघटना अध्यक्ष संतोष पेरणे, भाजप विधानसभा मतदारसंघ प्रमुख किरण ठाकरे, कोल्हारे ग्रामपंचायत सरपंच महेश विरले, शशिकांत मोहिते, चोपदार नाना महाराज, संन्यासी बाबा बार्डी, ह. भ. प. मधुकर महाराज कराळे, नामदेव महाराज उगले खोपिवली, जिल्हा परिषद माजी सदस्य जयश्री कराळे, हरिभाऊ महाराज पारधी, सुरेश गोमारे आदी उपस्थित होते.

या प्रसंगी किरण ठाकरे यांनी उल्हास नदीवरील त्रिवेणी संगमावर संरक्षण भिंत,दशक्रिया घाट आणि अन्य बांधकाम करण्याचे योगदान माजी मंत्री आमदार रवींद्र चव्हाण आणि शासनाच्या माध्यमातून देता आले याबद्दल आभार मानले. तर सरपंच महेश विरले यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून त्रिवेणी संगमावर शेड बांधण्याचे काम करता आल्याबद्दल आभार मानले. संतोष पेरणे यांनी कोल्हारे गावातील श्री विठ्ठल रखुमाई मंदिराचे समोरील सभागृहाचे काम सर्व अडथळे दूर करून लवकरात लवकर पूर्ण करावे. असे आवाहन केले.


**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given that our client **PUSHAPA HARI CHS SOCIETY LTD** have agreed to get assigned leasehold rights by executing the Deed of Conveyance in respect of following plot an constructed thereon from M/S Megharatan Construction Through its Proprietor MR. Purushottam R Patel having address at Nilgiri Apartment, Indira Nagar Naka Police Station, Thane Mumbai.

**Discription of the Plot**

| Node | Sector No. | Plot No. | Area Sq.Mtrs. |
|---|---|---|---|
| Kamothe Tal.Panvel, Dist.Raigad. | 10 | 05 | 150 |

All persons having and or claiming any right, title interest, claim or demand by way of sale, mortgage, lease, gift, exchange, inheritance, device trust, partition, charge, lien, possession or otherwise howsoever and whatsoever into upon or in respect of the lease of plot from **CIDCO LTD**, and the sale and assignment thereof of aforesaid plot or any part thereof as mentioned here above should make the same known in writing with documentary proof to the undersigned Advocate at their office within 14 days from the date of publication of this notice otherwise the right, titles, interest claim or demand if any will be considered or deemed to have been waived, released abandoned and give up, which may please note.

**C.B.D. BELAPUR, NAVI MUMBAI**

**DATE: २०/०१/२०२६**

sd/-
**Adv. SAVINA BANGERA**
**B.A, LLM**
**Advocate High Court & Notary**
**Advocate for Complainant**
**60, Mahalaxmi Mall, Sector 35,**
**Kamothe, Navi Mumbai.**
**Email:-** savinabangera@rediffmail.com
**Mob:- 9892024844**



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे उसाटणे ता. अंबरनाथ येथील श्री महेंद्र सावलचंद गांधी या व्यक्तीचे मालकीची व तावेकब्जातील खालील वर्णनाची खुली जागा (ओपन प्लॉट) आमचे अशिलांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**पालिकेचे नाव : अंबरनाथ**

इतर वर्णन : मौजे उसाटणे ता. अंबरनाथ जि. ठाणे येथील सर्व्हे नं. १६१/८, १४७/४ (Part) -७-८-९, १५७/४/१/अ-१ब, १५७/५-६, १५८/३, १५८/४/२ ब, १५८/५-६, १५९/१, १५९/२/१-२, १५९/३/१, १५९/३/२, १६१/१-२-४, १६१/३/१, १६१/५ (Part)-७, १४७/१, १६१/६, १५८/७, १४७/१२, १५७/४/२, एकुण क्षेत्र ७८, ७५० चौ. मी. वरील ओपन प्लॉट नं. ओपी ३८ (OP -३८) क्षेत्र ७००० चौ. फुट कारपेट ((Survey Number: १६/८ AND OTHER :))

**क्षेत्र : ७००० चौ. फुट**

सबब वर नमुद मिळकतीवर किंवा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, तावा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस, चार्ज वैगेरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत हक्क हितसंबंध स्वरूपाचे स्वरूपात विषद करून सर्व कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार हयांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडुन काही लेखी हरकत, दावा वैगेरे न आल्यास सदर जमिन मिळकत ही निर्वेध व वोजारहीत असुन त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा हितसंबंध नाही असे समजुन आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि. २०/०१/२०२६

सही/-
**ॲड. अतुल सुनिल जोशी**
**फ्लॅट नं. ००१ उमा निवास सोसायटी, महाराणा प्रताप रोड, डॉ. पोवळे हयांच्या क्लिनिक समोर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६**
**मोबा. ८६५२४९४१६०**



**रायगड सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
**स्वारस्य अभिव्यक्ती Expression of Interest (EOI)**

रायगड सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित प्लॉट नं.०७ सेक्टर नं. १३ खांदाकॉलनी (प) एच.डी.एफ . सी. बँक शेजारी वरील तळमजला +०३ मजले भुखंड क्षेत्राफळ १०००.०३ चौ. मीटर या इमारतीचा पुर्नविकास करणेचा सोसायटी व्यवस्थापनाचा मानस असुन त्याकरिता व्यवस्थापनामार्फत **प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट** (PMC) ची नेमणुक करणे आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) ची नियुक्ती करण्यासाठी सोसायटीमार्फत स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of interest) प्रसिध्द करणेत येत आहे, इच्छुक संस्था/पक्ष / संघटना (Farm) यांनी त्यासाठी रायगड सहकारी गृहनिमाण संस्था लि. यांच्याकडुन रुपये २५०/- भरणा करुन कोरी निविदा घेऊन जाणे आहे.

इच्छुकांनी निविदेनुसार आपले सिल बंद ऑफरपत्र दिनांक **२९/०१/२०२६** पर्यंत सोसायटी कार्यालयास सादर करावयाचे आहे.

**भेटण्याची वेळ : सोसायटी ऑफीस सायंकाळी ६.०० ते ७.३० वाजता. पुर्व परवानगीने.**

**संपर्क क्रमांक : ९८९२२७८१४४ / ९८६९४५७२७० / ८४२२०००९५**

Email ID: dattatray१६५९@gmail.com

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| सेक्रटरी | खजिनदार | चेअरमन |



**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-. वाजे, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या सामाईक मालकी हक्काची मिळकत असुन वा जमीन ही आमचे आशिलांनी खरेदी/विक्री करणे बाबत चर्चा केलेली आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

**-:: मिळकतीचे वर्णन ::-**
**मौजे: वाजे, तालका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | भोगवटाधारकाचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १९६ | ० | ०.८७.५०<br>०.०९.६०<br>०.९७.१० | १०.९४ | १. जगन्नाथ काळ्या पाटील<br>२. चंद्रभागा कुंडलिक पाटील<br>३. बबन कुंडलिक पाटील<br>४. मंदा चंदर माळी<br>५. शारदा एकनाथ मसणे<br>६. बेबीबाई गणू घरत<br>७. हरिश्चंद्र भाऊ डांगरकर<br>८. जयदास भाऊ डांगरकर<br>९. पुष्पा सखाराम डांगरकर<br>१०. अजय सखाराम डांगरकर<br>११. राकेश सखाराम डांगरकर<br>१२. शारदा बाळाराम माळी<br>१३. सुजाता मधुकर जाधव<br>१४. जिजाबाई नामदेव पाटील<br>१५. हरिश्चंद्र सिताराम मसणे<br>१६. अशोक सिताराम मसणे<br>१७. एकनाथ सिताराम मसणे<br>१८. अनुसया कृष्णा पाटील<br>१९. गोपाळ पदू सिनारे<br>२०. वत्सला पदू सिनारे<br>२१. रामदास पदू सिनारे<br>२२. प्रकाश पदू सिनारे<br>२३. शशिकांत पदू सिनारे<br>२४. इंदुबाई कान्हा जळे<br>२५. लक्ष्मण मारूती मढवी,<br>२६. सावित्री केशव माळी,<br>२७. दत्तात्रेय मारूती मढवी,<br>२८. मुक्ता सखाराम फुलोरे,<br>२९. उषा रामदास गायकवाड,<br>३०. आनंत नामदेव पाटील,<br>३१. सुशिला दुष्यांत कळवेकर,<br>३२. रमेश नामदेव पाटील,<br>३३. मंजुळा प्रवीण फडके,<br>३४. अर्चना विजय वाघमारे,<br>३५. प्रतीक्षा अविनाश घरत,<br>३६. शशिकांत तुकाराम पाटील,<br>३७. सूमन जनार्दन माळी<br>सर्व रा. वाजे, ता. पनवेल, जिल्हा रायगड |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, विकी, अदला-बदल, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, वारसाहक्क अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: पनवेल
दिनांक : २०/०१/२०२६

सही/-
**ॲड. विजयेंद्र बा. शितोळे**
**पत्ता-शॉप नं.०३,०४, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल, ता. पनवेल जि. रायगड पिन. ४१०२०६**
**मो. क्र. ८६५७९ ७७९४१**

# करंजा रो-रो सेवेच्या कामात आचारसंहितेचा अडथळा

**उरण : प्रतिनिधी**

रेवस, अलिबाग ते करंजा, उरण दरम्यानच्या रो-रो सेवेसाठी रेवस जेट्टी उभारण्याचे काम २०१८ पासून सुरू झालेले काम अपूर्ण आहे. यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया सूरु करण्यात आली आहे, मात्र राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकांची आचारसंहिता लागू असल्याने याची आचारसंहिता पूर्ण होई पर्यंत वाट पहावी लागणार आहे.त्यामुळे या दोन्ही जलमार्गाच्या कामाच्या खर्चात वाढ झाली आहे. यातील रेवस जेट्टीच्या कामात पाच कोटींच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या माध्यमातून करंजा व रेवस या दोन्ही जेट्टीचे काम करण्यात येत आहे. यातील करंजा बंदरावरील जेट्टीचे काम पूर्ण होऊन सात वर्षे झाली आहेत.



वापरा विना करंज जेट्टीची दुरवस्था होऊ लागली आहे. मात्र या जलमार्गावरील रेवस जेट्टीचे काम अनेक कारणांनी अपूर्ण आहे. या जेट्टीचे काम अर्धवट ठेवून कंत्राटदार गेला असल्याचे मेरिटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी नव्याने निविदा मागविण्या आल्या आहेत. त्यामुळे या जेट्टीचे काम पूर्ण होण्यासाठी आणखी काही महिने लागण्याची शक्यता आहे. तर मोरा ते मुंबईतील भाऊचा धक्का या रो रो मार्गावरील भाऊचा धक्का ही जेट्टी कार्यान्वित झाली आहे. मात्र मोरा जेट्टीचे काम चार वर्षांपासून थांबले होते. हे काम रखल्याने ५० कोटींच्या कामाची रक्कम ७५ कोटींवर पोहचली आहे.

तरीही जेट्टीचे काम अपूर्णच असून जेट्टी पर्यंत जाण्यासाठी मार्ग ही होऊ शकलेला नाही. उरण हा समुद्र आणि खाडी मार्गाने मुंबई आणि अलिबाग यांना जोडता यावा यासाठी स्वातंत्र्य पूर्व काळापासून जलसेवा सुरु आहे. मात्र या मार्गाने वाहन घेऊन प्रवास करता यावा याकरीता रो रो सेवा सुरू करण्याचा मानस आहे. हे काम वारंवार बंद होऊन रखडले आहे. त्यामुळे हे काम पूर्ण होणार का असा सवाल आता या मार्गावरील प्रवासी आणि नागरिक करू लागले आहेत.

मोरा-मुंबई व अलिबाग आणि उरणला जोडणाऱ्या रेवस ते करंजा मार्गावरील रो-रो सेवा खरचं सुरू होणार का अशी शंका व्यक्त केली जात आहे. याचे मुख्य कारण म्हणजे उरणला मुंबईशी जोडणाऱ्या अटलसेतुमुळे मुंबईत वाहन घेऊन जाणारे या सेतूचा वापर करू लागले आहेत. तर रेवस करंजा या सागरी पुलाच्या काम ही वेगाने सुरू आहे. त्यामुळे करंजा रेवस या जल मार्गावरील रो रो सेवा चालणार का ? अशीही शंका व्यक्त केली जात आहे. करंजा ते रेवस रो रो ची नव्याने निविदा काढण्यात आली आहे. त्यामुळे रेवस जेट्टीचे काम लवकरच सुरु करण्यात येऊन ते पूर्ण करून ही सेवा सुरु करण्यात येणार असल्याची माहीती हाती आली आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पालक-शिक्षक सभा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवार दिनांक १७ जानेवारी रोजी पालक-शिक्षक समितीतर्फे तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी पालक-शिक्षक सभेचे आयोजन केले होते.



या पालक-शिक्षक सभेसाठी महाविद्यालयातील सर्व शाखेतील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी उपस्थित राहून त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक विकास, वर्गांमध्ये असणारी उपस्थिती तसेच वेगवेगळ्या शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग याविषयी वर्गशिक्षकांशी संवाद साधला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी उपस्थित पालकांशी संवाद साधून महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेण्यात येणारे वेगवेगळे शैक्षणिक, सामाजिक, पर्यावरणीय उपक्रम, अभ्यासक्रम, करियर गायडन्स सत्रे तसेच, प्लेसमेंट ड्राईव्ह, मूल्यमापन पद्धती तसेच महाविद्यालयात घेण्यात येणारे आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धा त्यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग याविषयी मार्गदर्शन व सर्व पालकांच्या शंकांचे निरसन केले.

या पालक शिक्षक सभेचे आयोजन प्रा. नीलम मोरे, प्रा. तनुजा सुमन यांनी केले तसेच, प्रा. डॉ. नीलम लोहकरे, प्रा. डॉ. रीत ठुले ,प्रा.विशाल देशमुख, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. रिजवाना मोमीन, प्रा. डॉ. प्रवर शर्मा हे सर्व विभाग प्रमुख तसेच पालक-शिक्षक समितीतील इतर सर्व सदस्यांनी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# वासांबे आई महिला बचत गटाकडून हळदीकुंकू समारंभातून हिंदू जनजागृती



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील सर्वाधिक सदस्य संख्या असलेला मोहोपाडा येथील वासांबे आई महिला बचत गटाचा हळदी कुंकू समारंभ मोठ्या उत्साहात व थाटामाटात ग्रामपंचायत सदस्या रसिका राकेश खराडे यांच्या आवारात आयोजित करण्यात आला होता,या कार्यक्रमात हिंदू सण, हिंदू संस्कृती, लव जिहाद, महिलांवरील अत्याचार,महिला एकजुटीकरण,नाम साधना या विविध विषयावर महिलांना मार्गदर्शन करण्यात आले,या कार्यक्रमाकरिता वासांबे रसायनी महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या,या हळदीकुंकू समारंभाचा ५२३ महिलांनी लाभ घेतला.यावेळी मोहोपाडा वासांबे आई महिला बचत गटाच्या महिलांनी पारंपारिक नाच करुन कार्यक्रम साजरा केला.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोहोपाडा येथील वासांबे आई महिला बचत गटाच्या महिलांनी अथक परिश्रम घेतले.

# गव्हाण फाटा-चिरनेर मार्गावरील पूल मार्च अखेरपर्यंत होणार खुला

## तीन वर्षानंतर पाच हजार प्रवासी, वाहनचालकांची गैरसोय दूर होण्याच्या दिशेने

**उरण : प्रतिनिधी**

मागील तीन वर्षभरापासून रखडत सुरू असलेल्या उरण पूर्व विभागाला जोडणाऱ्या गव्हाण फाटा-चिरनेर दरम्यानच्या मालगाडी रेल्वे मार्गावरील ओव्हरहेड नवा पुल उभारण्याचे काम येत्या मार्च २०२६ अखेरपर्यंत पुर्ण होईल.त्यानंतर या मार्गावरील प्रवासी वाहतूक सुरळीत होणार असल्याने मार्गावरुन दररोज प्रवास करणाऱ्या पाच प्रवासी व वाहनांना दिलासा मिळणार आहे.

जेएनपीए बंदरातुन देशभरात कंटेनर मालाची वाहतूक करणाऱ्या रेल्वे मार्गावरील दुहेरी कंटेनर (ट्रवीन) वाहतूक करण्याची योजना आखली आहे. ही दुहेरी कंटेनर वाहतूक उंची वाढवुन सुरळीत सुरू करण्यासाठी उरण पूर्व विभागाला जोडणाऱ्या गव्हाण फाटा-चिरनेरदरम्यानच्या मालगाडी रेल्वे मार्गावरील जुना ओव्हरहेड पुल (आरओबी) तीन वर्षांपूर्वी पाडण्यात आला आहे. पाडण्यात आलेल्या या



ओव्हरहेड पुलाच्या जागी नवीन पुलाचे काम मागील तीन वर्षांपासून रखड पट्टीत सुरू आहे.

याच जुन्या पुलावरून पनवेल, मुंबई, नवी मुंबई व ठाण्यासह इतर मार्गाकडे जाणाऱ्या व उरण पूर्व विभागाशी जोडणारा गव्हाणफाटा - चिरनेर रस्त्यावरुन दररोज पाच हजारांहून अधिक वाहने आणि प्रवासी प्रवास करीत होते, मात्र मध्य रेल्वेच्या कंटेनर मालाची वाहतूक करणारा ओव्हरहेड पाडण्यात आल्यानंतर जुना ओव्हरहेड पुलावरील वाहतूक पुर्णपणे बंद करण्यात आली आहे. या नव्याने ओव्हरहेड पुलाच्या बांधकामासाठी या मार्गावरुन येजा करणाऱ्या वाहनचालकांची व प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून मात्र पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे, परंतु पर्यायी रस्ता वाहनांना गव्हाणफाटा सर्कल वरून सुमारे दीड किलोमीटरचा वळसा घालून चिर्ले मार्गावरुन प्रवास करावा लागत आहे, तर चिरनेर मार्गांवरून येणाऱ्या वाहनांना पनवेलकडून येणाऱ्या महामार्गाच्या उलट्या धोकादायक मार्गातून वळसा घेऊन गव्हाण फाटा मार्ग गाठावा लागत आहे.

गव्हाण फाटा-चिरनेर मार्गांवरील रेल्वे पूल बंद करण्यात आल्याने उरण तालुक्यातील जांभूळपाडा, वेश्वी, दिघोडे या गावाची एसटी बससेवा बंद झाली आहे.तसेच या मार्गांवर अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली आहे तसेच हा पर्यायी रस्ता प्रवासी रिक्षा, मॅजिक रिक्षा आणि अन्य वाहनांसाठी धोकादायक ठरू लागलेला आहे. सर्वासाठी खार्चिक ठरलेला पर्यायी रस्ता बाजारहाट व अन्य कामांसाठी पनवेल, नवी मुंबई मार्गाकडे जाण्यासाठीही गैरसोयीचा ठरु लागला आहे. त्यामुळे या मार्गावरील ओव्हरहेड पुलाचे काम मध्य रेल्वे प्रशासन पुर्ण करण्याची अपेक्षा नागरिकांना होती, मात्र कामाच्या विलंबामुळे प्रवासी व वाहनचालकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होऊ लागली आहे. यामुळे प्रवासी आणि वाहनचालकांची काम लवकर पूर्ण करण्याची मागणी आहे.

काही तांत्रिक अडचणींमुळे या पुलाच्या कामाला विलंब झाला असला तरी मात्र मागील तीन वर्षभरापासून रखडलेल्या मालवाहू रेल्वे मार्गावरील ओव्हरहेड पुलाचे काम जोमाने सुरू आहे. कामाला वेग आला आहे. यामुळे येत्या मार्च २०२६ अखेरपर्यंत पुलाचे काम पूर्णत्वास जाईल अशी माहिती रेल्वे विभागाच्या डेडिकेटेड फ्रंट कॉरिडॉर (डीएफसीसीआयएल) विभागाचे सहाय्यक अभियंता राघवेंद्र श्रीवास्तव यांनी दिली. त्यामुळे या मार्गावरुन दररोज प्रवास करणाऱ्या पाच प्रवासी व वाहनांना दिलासा मिळणार आहे.

# माजी सरपंच चंद्रकांत भोईर अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी दिल्लीतर्फे सन्मानित

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचे सुपुत्र, पळस्पे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व लोकांच्या मनात घर करून राहिलेले लोकप्रिय नेतृत्व चंद्रकांत भोईर यांना त्यांच्या समाजोपयोगी कार्याची दखल घेत अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी (दिल्ली) यांच्याकडून सोशल वर्क क्षेत्रातील मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पुरस्कारामुळे संपूर्ण पनवेल तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

खेळाडू म्हणून कारकीर्द सुरू करून पुढे आदर्श सरपंच व संवेदनशील लोकनेता म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे चंद्रकांत भोईर हे सर्वसामान्य जनतेचे खरे अर्थाने आधारवड ठरले आहेत. सामाजिक बांधिलकी, विकासात्मक दृष्टीकोन, दानशूर वृत्ती आणि माणुसकीची जाणीव



यांचा संगम त्यांच्या कार्यात दिसून येतो. त्यांच्या या लोककल्याणकारी कार्याला या मानद डॉक्टरेट पुरस्काराने आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे.

हा पुरस्कार स्वीकारताना चंद्रकांत भोईर यांनी, माझ्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर साथ देणाऱ्या, मार्गदर्शन करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांना व जनतेला मी हा सन्मान समर्पित करतो. माझ्या हातून सदैव सत्कर्म घडो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना आहे, अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या.

प्रसिद्ध उद्योजक राजन शेलार यांनीही या सन्मानाबद्दल प्रतिक्रिया देताना म्हटले की,खेळाडूपासून लोकनेत्यापर्यंतचा चंद्रकांत भोईर यांचा प्रवास हा आदर्श आणि प्रेरणादायी आहे. जागतिक पातळीवर त्यांनी नाव उज्ज्वल केले आहे.माजी सरपंच चंद्रकांत भोईर यांच्या या आंतरराष्ट्रीय सन्मानामुळे सामाजिक कार्याला नवी प्रेरणा मिळाली असून, रायगड जिल्ह्याच्या इतिहासात हा क्षण सुवर्णाक्षरांनी नोंदवला जाणार आहे.

# सायबर क्राईम आणि आवश्यक काळजी विषयावर मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ज्ञाती मंच मुलुंड ह्या नवनिर्मित संस्थेचा उदघाटन समारंभ रविवार दिनांक ८ फेब्रुवारी रोजी, सकाळी १०.३० वाजता, श्री. राजीव पोतनीस, अध्यक्ष, सी. के. पी. संस्था, दादर, यांच्या शुभहस्ते विद्याप्रबोधिनी कनिष्ठ महाविद्यालय, मुलुंड पूर्व येथे आयोजित केला आहे,

या कार्यक्रमा नंतर 'सायबर क्राईम आणि आवश्यक काळजी'ह्या विषयावर म्हाडा पोलीस स्टेशनचे अधिकारी, यांचे महत्वपूर्ण व्याख्यान आयोजित केले आहे, तरी ह्या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष. ओंकार गुप्ते, कार्यवाह योगेश देशमुख, श्रीमती अमृता गुप्ते . चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ज्ञाती मंच मुलुंड आणि कार्यकारणी समितीने केले आहे,

# सिडको युनियनतर्फे हळदीकुंकू समारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको एम्प्लॉइज युनियनने सिडकोतील महिला कर्मचारी,अधिकारी यांच्यासाठी सिडकोभवन येथील सभागृहात हळदीकुंकू समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

युनियन प्रतिनिधी प्रमिला पाटील, हर्षदा पाटील,माधवी शिंदे, अनिता उरणकर,नीता पाटील, रश्मी देशमुख, सीमा पाटील, माधुरी माणिक्कुवर, प्रीती भैसारे, साधना म्हात्रे, नमिता उभारे, मनिषा सोनवणे, अश्विनी शिंदे व मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सूरवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरवातीला सिडको एम्प्लॉइज युनियन चे अध्यक्ष सुभाष पाटील व सरचिटणीस नितीन कांबळे यांनी सर्व महिला कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

सदर समयी सिडको युनियनचे खजिनदार योगेश ठाकूर, सहसचिव सुधीर कोळी, संजीवन पाटील आदी उपस्थित होते.



# बेलापूरमध्ये रंगला शालेय विद्यार्थ्यांच्या कलेचा आविष्कार

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नवी मुंबई सांस्कृतिक कला-क्रीडा महोत्सव २०२६ अंतर्गत सीबीडी बेलापूर येथील सुनील गावस्कर मैदानावर शालेय समूह नृत्य स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास आमदार मंदाताई म्हात्रे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन दिले. सदर स्पर्धेत नवी मुंबईतील विविध शाळा तसेच महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली. देशभक्तीपर गीतांवर आधारित नृत्य, पारंपरिक लोकनृत्य तसेच बहारदार कोळीगीतांवरील सादरीकरणांनी उपस्थित प्रेक्षकांची



मने जिंकली. मुलांमधील सुप्त कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावे व त्यांना आपल्या समृद्ध संस्कृतीची ओळख व्हावी, या उद्देशाने आयोजित या स्पर्धेतील विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे आमदार मंदा म्हात्रे यांनी विशेष कौतुक केले.

तसेच शालेय समूह नृत्य स्पर्धेत प्राथमिक विद्या मंदिर, बेलापूर यांनी प्रथम पारितोषिक पटकावला, पीपल्स एज्युकेशन इंग्रजी माध्यम शाळा, सीबीडी बेलापूर यांनी द्वितीय पारितोषिक, तर पी. एस. सेंटर स्कूल यांनी तृतीय पारितोषिक मिळवला. तसेच गौरव स्कूल यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. विजेत्या व सहभागी सर्व विद्यार्थ्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

तसेच आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, हा महोत्सव येत्या २५ तारखेपर्यंत सुनील गावस्कर मैदान येथे सुरू राहणार असून, या कालावधीत नागरिकांसाठी विविध कला, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी उपलब्ध असणार आहे. तरी सर्व नवी मुंबईकर नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहून या महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्यासमवेत शाळकरी विद्यार्थी, शिक्षकवर्ग तसेच सीबीडीमधील नागरिक व श्री गोवर्धनी सेवा संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते

# पर्यटन जनजागृतीपर सागर महोत्सव साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र शासन अंतर्गत जबाबदार पर्यटनाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये तसेच जनसामान्यांमध्ये जनजागृती निर्माण व्हावी या दृष्टीकोनातून रत्नागिरी येथे सागर महोत्सावाचे आयोजन करण्यात आले होते. सदर महोत्सावाचे प्रायोजकत्व मे. आसमंत बेनेव्होलेन्स फाऊंडेशन, रत्नागिरी या संस्थेस देण्यात आले होते. त्यानुषंगाने दि.१५ ते १८ जानेवारी २०२६ या कालावधीत रत्नागिरी शहरातील अंबर हॉलमध्ये सागर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पद्मश्री शैलेश नायक यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमास लाभली होती.

सागर महोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्यावतीने पर्यटनास चालना



देण्यासाठी ज्या अनेकविधयोजना राबविण्यात येतात त्यासंबंधीत जनजागृती होण्याच्यादृष्टीने विभागीय पर्यटन संचालनालय, कोकण तर्फे स्टॉल उभारण्यात आला होता. कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थी तसेच नागरिकांना कृषी पर्यटन, किल्ले पर्यटन, अध्यात्मिक पर्यटन, होमस्टे पर्यटन धोरण, २०२४, आई योजना, महाबुकींग इत्यादी बाबत माहिती देण्यात आली. तसेच कार्यक्रमाचे उद्धाटन प्रसंगी पर्यटन उपसंचालक, कोकण विभाग, डॉ. प्रज्ञा मनोहर यांनी आपल्या भाषणातून पर्यटनासाठी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. उपस्थितांनी संचालनालयातर्फे लावण्यात आलेल्या स्टॉलला मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली. अजिंक्य लुगडे, सहाय्यक जिल्हा पर्यटन अधिकारी, मोहित सावळा, प्रकल्प अधिकारी (आई योजना), तसेच पंकज सावंत यांनी स्टॉलला भेट दिलेल्या उपस्थितांना योजनांची तसेच कोकण विभाग अंतर्गत जिल्ह्याच्या पर्यटन स्थळांविषयी विस्तृत माहिती दिली.

उपसंचालक मनोहर यांनी पर्यटनाला चालना देण्यासाठी काही उपाययोजना करण्यात येऊ शकतील याबाबत उपस्थितांशी चर्चा केली, अशी माहिती विभागीय पर्यटन कार्यालय कोकण विभाग यांनी पत्रकान्वये दिली.

# शिवरायांच्या पुतळ्यासाठी लागणारे साहित्य चोरणारे आरोपी गजाआड

## २४ तासांत पेण पोलिसांकडून दोन गुन्ह्यांची उकल

**पेण : प्रतिनिधी**

पेण पोलिसांनी अवघ्या २४ तासांत दोन चोरीच्या गुन्ह्यांचा पर्दाफाश करत तीन अट्टल गुन्हेगारांना अटक केली असून एक लाख २१ हजार ९०० रुपये आणि १६ हजार ७०० रुपये असा एकूण एक लाख ३८ हजार ६०० रुपये किमतीचा चोरीचा माल हस्तगत केला आहे.



याबाबत माहिती अशी की, पेण नगर परिषद परिसरातील इनडोअर गेम हॉलमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पंचधातूच्या वस्तू शेजारच्या गोडावूनमधील उघड्या खिडकीतून प्रवेश करून चोरून नेल्याची घटना दोन दिवसांपूर्वी घडली होती. या प्रकरणाचा तपास करत असताना पेण पोलिसांनी तरुण विलास चव्हाण आणि राम विजय गवळी उर्फ रामा रेड्डी यांना अटक केली. हे दोन्ही आरोपी पेण आयटीआय कॉलेज परिसरातील झोपडपट्टीतील रहिवासी आहेत. आरोपींकडून एक लाख २१ हजार ९०० रुपये व १६ हजार ७०० रुपये किमतीचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तपासादरम्यान आणखी एका चोरीच्या गुन्ह्याची उकल झाली असून त्यातील एका अट्टल चोरालाही अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी गणेश प्रशांत मयेकर (वय ३९) यांनी दिलेल्या तक्रारीवरून तपास सुरू करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, निरीक्षक संदीप बागुल यांच्या सुचनाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण कक्षातील अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश राजपूत, उपनिरीक्षक सुनील चव्हाण, सहाय्यक उपनिरीक्षक राजेश पाटील, हवालदार प्रकाश कोकरे, अजिंक्य म्हात्रे, सचिन व्हास्कोटी, सुशांत भोईर, अमोल म्हात्रे, शिपाई गोविंद तलवारे, संदीप शिंगाडदे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# जि.प., पं.स. निवडणुकीसाठी भाजपला पोषक वातावरण –देसाई

**पाली : प्रतिनिधी**



राज्यात नगर परिषद आणि नगरपालिका निवडणुकीत आपला डंका वाजविल्यानंतर भाजपने महापालिका निवडणुकीतही बाजी मारली. त्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडूक होत आहे. या पार्श्वभूमीवर पत्रकारांशी बोलताना भाजप नेते प्रकाश देसाई यांनी, रायगड जिल्ह्यात भाजप संघटनात्मकदृष्टच्या मोठी उभारी घेत असून जिल्ह्यात भाजपला पोषक वातावरण असल्याचे म्हटले आहे.

संपूर्ण देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपाने जादुई कामगिरी व घोडदौड केली आहे. भाजपचे धुरंधर नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सक्षम नेतृत्व व मार्गदर्शनात पक्षाने राज्यात देदीप्यमान यश मिळवले आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी आम्ही सर्व नेतेमंडळी, पदाधिकारी व कार्यकर्ते कामाला लागलो आहोत. भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांच्या नेतृत्वात भाजप पक्ष क्रमांक १चा म्हणून सत्तेत असेल, असे देसाई म्हणाले.

सुधागड तालुक्यात जांभूळपाडा, परळी जिल्हा परिषद गटात माजी जि. प. अध्यक्ष ॲड. नीलिमा पाटील निवडणुकीत रिंगणात उतरणार आहेत. आम्ही यापूर्वीच्या निवडणुकीत सुधागडातून निजामपूरच्या सुजाता गोपाळ यांना जिंकून आणले होते. संपूर्ण जिल्ह्याच्या मतदारसंघात कोणताही उमेदवार कुठेही निवडणूक लढवू शकतो. मी अधिकृतरित्या नीलिमा पाटील यांच्या उमेदवारीबद्दल अधिकृत घोषणा करीत नाही, परंतु आमच्याकडे माजी जि.प. सदस्य गीता पालरेचा, नीलिमा पाटील, उज्वला देसाई, श्रद्धा कानडे अशा सक्षम व इच्छुक महिला उमेदवार आहेत, तरी केवळ जिंकणे हे लक्ष न ठेवता प्रशासनाचा अनुभव, विकासात्मक दृष्टिकोन, जनतेच्या प्रश्न समस्यांना न्याय देण्याची भूमिका यावरून वरिष्ठ मंडळी उमेदवारीबाबत योग्य तो निर्णय घेतील, असे देसाईंनी स्पष्ट केले.

# नागोठण्याचे उपसरपंच अखलाक पानसरे राष्ट्रवादीत स्वगृही परतले



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच अखलाक पानसरे व जफर कुरेशी सहकाऱ्यांसह खासदार सुनील तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)मध्ये प्रवेश केला. या वेळी तटकरे पिता–पुत्रांनी पानसरे व समर्थकांचे पक्षात स्वागत केले.

सुतारवाडी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यलयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमात बोलताना पानसरे यांनी सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेसचे विचार, विकासाभिमुख धोरणे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून तसेच माजी जि.प. सदस्य किशोर जैन यांच्यावर विश्वास ठेवून आपण पक्षात घरवापसी करीत आहोत. या कार्यक्रमास राष्ट्रवादीचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रवादीचे रमेश मोरे पुन्हा शिवसेनेत दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक रणधुमाळीत गेल्या अडीच महिन्यापूर्वी शिंदे शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलेले माजी उपजिल्हाप्रमुख रमेश मोरे यांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देत पुन्हा शिवसेनेत प्रवेश केला आहे.



## विजय मोरे यांच्या हातीसुद्धा 'धनुष्यबाण'

या वेळी राष्ट्रवादीचे माणगाव तालुका उपाध्यक्ष विजय (राजू) मोरे यांनीदेखील समर्थकांसह मंत्री भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

मोरे यांचा पक्षप्रवेश सोहळा आणि माणगाव तालुक्यातील जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीच्या उमेदवारांचे अर्ज दाखल करणे हा कार्यक्रम सोमवारी कुणबी भवन हॉल माणगाव या ठिकाणी मंत्री गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत झाला.

या वेळी मार्गदर्शन करताना मंत्री भरत गोगावले म्हणाले की, येत्या ५ फेब्रुवारीला जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक होत असून या निवडणुकीदरम्यान रमेश मोरे हे पुन्हा एकदा शिवसेना पक्षात स्वगृही आले असून राष्ट्रवादीचे राजू मोरेही शिवसेनेत दाखल आले आहेत. सर्वांचे मी शिवसेना पक्षात जाहीर स्वागत करतो. या निवडणुकीत पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी हातात हात घालून काम करावे.

तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र माणकर यांनी येणाऱ्या निवडणुकीत पक्षाच्या उमेदवारांना विजयी करावे, असे आवाहन केले. प्रवेशकर्ते रमेश मोरे यांनी, मंत्रीमहोदयांनी यांनी मला मोर्बा जिल्हा परिषद गटातून उमेदवारी जाहीर केल्याने मी त्यांचे, शिवसेना पक्ष आणि सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त करतो, असे सांगितले.

या कार्यक्रमास शिवसेना नेते अनिल नवगणे, सुधीर पवार, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, उपजिल्हाप्रमुख अविनाश नलावडे, म्हसळा सभापती राखी करंबे, माजी सभापती रामभाऊ म्हसकर, सुजित शिंदे, निजामपूर सरपंच राजाभाऊ रणपिसे, विभाग प्रमुख शरीफ हार्गे, मनोज सावंत, मंगेश सावंत, दाऊद मापकर, राकेश पवार, फैमिद जामदार, संतोष पोळेकर आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# रोहा-तांबडी रस्त्याची दुरवस्था; वाहनचालक, प्रवाशांकडून डागडुजीची मागणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील दुर्गम भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तांबडी–बारशेत रस्त्याची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली असून संपूर्ण रस्ता खड्डे व दगडांच्या साम्राज्यात बदलला आहे. तब्बल १० किलोमीटरच्या या रस्त्यावर डांबरीकरणाचा कुठलाही थर दिसून येत नसल्याने वाहनचालक, प्रवासी व ग्रामस्थांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या रस्त्याची डागडुजी करण्याची मागणी होत आहे.

तांबडी–बारशेत रस्त्यावरून शाळकरी विद्यार्थी, कष्टकरी शेतकरी, कामगारवर्ग तसेच ज्येष्ठ नागरिक एसटी बससह अन्य वाहनांतून नियमित प्रवास करतात, मात्र रस्त्याची दुरवस्था इतकी गंभीर आहे की रोजचा प्रवास नाहक त्रासदायक ठरत आहे.

या रस्त्यालगत तांबडी बुद्रुक, निवी ठाकरवाडी, सवाने, बारशेत गौळवाडी, म्हासाडी, वाली, कारिवणे ही गावे येतात. या गावांतील नागरिकांना रोहा बाजारपेठ, शासकीय कार्यालये, दवाखाने व इतर कामांसाठी याच रस्त्यावरून प्रवास करावा लागतो.

या रस्त्याची तातडीने दुरूस्ती करून तो खड्डेमुक्त व सुरक्षित करण्यात यावा, अशी जोरदार मागणी प्रवासीवर्ग व स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

**या रस्त्याच्या कामाचे टेंडर पास झालेले आहे, परंतु आचारसंहिता लागली असल्यामुळे काम चालू करता येत नाही. आचारसंहिता शिथील होताच लगेच काम चालू करण्यात येईल. चार किलोमीटर रस्ता आम्ही तयार करणार आहोत.**

**–विजय बागुल, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग रोहा**



# निबंध, वक्तृत्व आणि हस्ताक्षर स्पर्धेत लोखंडे विद्यालयाचे यश

**मुरुड : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांची बुद्धिमता वृद्धिंगत करण्यासाठी व एखाद्या विषयावर सहज लिखाण करता यावे, त्यांना सभोवतालची परिस्थिती पारखून लिखाण करता यावे यासाठी मुख्याध्यापक संघाकडून निबंध, वक्तृत्व व हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले.

रायगड जिल्हा मुख्याध्यापक संघ आयोजित गो.म.वेदक विद्यालय येथे झालेल्या निबंध, वक्तृत्व व हस्ताक्षर स्पर्धेत अशोक ल.लोखंडे विद्यालय, पिटसई येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले आहे.

निबंध स्पर्धेत ८वी ते १०वी गटात स्नेहल गणेश तांदळेकर प्रथम, हस्ताक्षर स्पर्धेत ८वी ते १०वी गटात स्नेहल गणेश तांदळेकर प्रथम, वक्तृत्व स्पर्धेत ८वी ते १०वी गटात चेतना नरेश सावरटकर प्रथम आणि निबंध स्पर्धेत ५वी ते ७वी गटात संस्कार सुनील तेलंगे याने द्वितीय क्रमांक पटकाविला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक भगिनाथ बांगर व सुप्रिया रेडीज यांचे संस्थेचे अध्यक्ष खेळूशेठ वाजे, सेक्रेटरी संजय रेडीज व इतर पदाधिकारी तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण खुळपे, ज्येष्ठ शिक्षक अकील मुलाणी व इतर सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# वाढदिवसानिमित्त शेडगेंचे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

रोह्याच्या नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांच्या वाढदिवसानिमित्त २१ जानेवारी रोजी एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे. वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना बॅनर, पोस्टर्स किंवा पुष्पगुच्छऐवजी पुस्तके भेट म्हणून द्यावीत, असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले आहे.

शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून ते समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. वाचनातून आत्मविश्वास वाढतो, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो आणि जबाबदार, संवेदनशील नागरिक घडतात. त्यामुळे बॅनर–फुलांपेक्षा पुस्तक भारी हा संदेश केवळ घोषवाक्य न राहता तो सकारात्मक बदल घडविणारा ठरावा, असे शेडगे यांनी म्हटले आहे.

# धाटाव येथे वूशु, लाठी-काठी प्रशिक्षण

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुका क्रीडा संकुल, धाटाव येथे भारताचे पहिले ऑलिम्पिक पदक विजेते, थोर कुस्तीपटू कै. खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त सह्याद्री मार्शल आर्ट असोसिएशनच्या वतीने विशेष वूशु आणि लाठी–काठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणामुळे खेळाडूंना नव्या तंत्रांची ओळख झाली असून प्रत्यक्ष सरावातून विविध कौशल्ये आत्मसात करता आली.



कुस्ती व वूशु खेळामध्ये प्रतिस्पर्ध्याला कशा प्रकारे अचूकपणे पाडावे याचे प्रात्यक्षिक मॅटवर करून मुलांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले. त्यासोबतच पारंपरिक काठी–लाठीच्या चार हातांच्या सरावातून आत्मसंरक्षणाचे धडे देण्यात आले. सर्व खेळाडूंनी या प्रशिक्षणाचा उत्स्फूर्त आनंद घेतला असून आगामी स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचा आत्मविश्वास व्यक्त केला.

या प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन समारंभास रोहा तालुक्याच्या क्रीडा अधिकारी अंकिता मथेकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. समवेत त्यांचे सहकारी रवींद्र कानेकर, सह्याद्री मार्शल आर्ट असोसिएशनचे संस्थापक राकेश पाटील, रोहा तालुका उशु प्रमुख वृषाल गोवर्धन, काठी–लाठी व आत्मसंरक्षण प्रशिक्षक रंजीत रेवाळे तसेच मनस्वी खांडेकर आदी उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना अंकिता मथेकर यांनी वूशु व लाठी–काठी या खेळांचे शारीरिक व मानसिक विकासातील महत्त्व विशद केले. सह्याद्री मार्शल आर्ट संस्था शिस्त, संयम व आत्मविश्वास घडविण्याचे कार्य करत असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण पुस्तिका व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

# आरसीबी डब्ल्यूपीएलच्या प्लेऑफमध्ये

**वडोदरा : वृत्तसंस्था**

महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल)च्या चौथ्या हंगामात स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखालील रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने सलग पाचव्या विजयासह प्लेऑफमध्ये एन्ट्री मारली. वडोदरा येथील कोटांबी स्टेडियमवर झालेल्या डब्ल्यूपीएल २०२६मधील १२व्या सामन्यात आरसीबीने गुजरात जायंट्सवर विजय साकारला.



गुजरात जायंट्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. स्मृती मंधाना २६ धावा करून माघारी फिरल्यावर आरसीबी संघाच्या आघाडीच्या फळीतील बॅटर्सनी निराश केले. संघ अडचणीत असताना रायझिंग स्टार गौतमी नाईकने जबरदस्त परफॉमन्स दिला. तिने ५५ चेंडूत सात चौकार आणि एक षटकारासह ७३ धावांची खेळी करत संघाच्या धावफलकावर निर्धारित २० षटकांत सहा विकेट्सच्या मोबदल्यात १७८ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना गुजरात जाएंट्सचा संघ ११७ धावांत आटोपला.

धावांचा पाठलाग करताना गुजरात जायंट्सकडून अ‍ॅश्ली गार्डनरने अर्धशतक झळकावले. तिने केलेल्या ५४ धावांच्या खेळीशिवाय अनुष्का शर्माने केलेल्या १८ धावा वगळता अन्य एकाही बॅटरला धमक दाखवता आली नाही. परिणामी गुजरातच्या संघाला ६१ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. दुसरीकडे सलग पाचव्या विजयासह आरसीबीच्या संघाने प्लेऑफचे तिकीट मिळवले. आरसीबी यंदाच्या हंगामात प्लेऑफमध्ये एन्ट्री मारणारी पहिली टीमही ठरली.

दरम्यान, तीन लीग सामने शिल्लक असताना आरसीबी आता आपल्या कमालीच्या फॉर्मसह इतर संघाचे समीकरण बदलणार आहे. इतर संघ चार आणि त्यापेक्षा कमी गुणांवर आहेत.

## 'बॅडमिंटन क्वीन' सायना नेहवाल निवृत्त

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

भारतीय बॅडमिंटनला जागतिक नकाशावर मानाचे स्थान मिळवून देणारी



बॅडमिंटन क्वीन सायना नेहवाल हिने स्पर्धात्मक बॅडमिंटनमधून निवृत्तीची घोषणा केली. गेल्या अनेक दिवसांपासून गुडघ्याच्या दुखापतींशी झुंजणाऱ्या सायनाने शरीर साथ देत नाही, असे म्हणत आपल्या भावना व्यक्त केल्या आणि कारकिर्दीला पूर्णविराम दिला.

गेल्या दोन वर्षांपासून सायना गुडघ्याच्या जुनाट समस्येमुळे त्रस्त होती. तिने आपला शेवटचा सामना २०२३च्या सिंगापूर ओपनमध्ये खेळला होता. एका पॉडकास्टमध्ये बोलताना सायनाने स्पष्ट सांगितले की, माझ्या गुडघ्याची दुखापत गंभीर असून मला संधिवात झाला आहे. जर तुमचे शरीर साथ देत नसेल, तर थांबणेच योग्य असते. सायना नेहवालने २०१२च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकून इतिहास घडवला होता.

## अलिबागमध्ये रंगणार राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असणाऱ्या अलिबाग येथील आरसीएफ स्पोर्ट कॉम्प्लेक्स येथे २२ ते २६ जानेवारी या कालावधीत राष्ट्रीय स्तरावरील फिल्ड इनडोअर अर्चरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय केमिकल अ‍ॅण्ड फर्टिलायझर्स थळ, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ इंडिया आणि फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा होणार आहे.

देशातील १९ राज्यांमधील सुमारे ६५० नेमबाजांनी आपला सहभाग या राष्ट्रीय स्पर्धेसाठी नोंदविला असल्याची माहिती फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ इंडियाचे महासचिव सुभाष नायर यांनी दिली. स्पर्धा सात, १०, १४, १७, १९ वर्षांखालील तसेच वरिष्ठ गट आणि वरिष्ठ अनुभवी धनुर्धर गटांमध्ये खेळली जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

या स्पर्धेत नाईन स्पॉट नावाचा धनुर्विद्या स्पर्धेतील प्रकार प्रमुख आकर्षण ठरणार आहे. तो पाच गटात खेळवला जाणार आहे. यामध्ये १०, १४, १७ आणि १९ वर्षांखालील प्रत्येक गटासाठी प्रथम पारितोषिक २५ हजार, द्वितीय १५ हजार आणि तृतीय पारितोषिक १० हजार रुपये असणार आहे, तर वरिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक एक लाख रुपये, द्वितीय ५० हजार रुपये आणि तृतीय पारितोषिक २५ हजार रुपये असणार आहे.

स्पर्धेचा उद्घाटन सोहळा २३ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता आरसीएफ स्पोर्ट कॉम्प्लेक्स कुरूळ, अलिबाग येथे होणार आहे. या सोहळ्यासाठी राष्ट्रीय केमिकल अ‍ॅण्ड फर्टिलायझर्सचे कार्यपालक निदेशक हिरडे, रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, राष्ट्रीय केमिकल अँड फर्टिलायझर्सचे चिफ मॅनेजर अ‍ॅडमिन महेश पाटील, फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष सीताराम चव्हाण, उपाध्यक्ष संजय पिटवा, सहसचिव रितिका नायर, उपाध्यक्ष अनुप देढे, उपाध्यक्ष मनीष जेडली आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जेबीएसपी आंतर-संस्था बुद्धिबळ स्पर्धा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आंतर-संस्था बुद्धिबळ स्पर्धा २०२६चे आयोजन खांदा कॉलनी येथील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) लॉ कॉलेजमध्ये करण्यात आले होती. ही स्पर्धा केवळ एक खेळ म्हणून नव्हे, तर जेबीएसपी संस्थेची सर्वांगीण विकास, शिस्त, उत्कृष्टता आणि नेतृत्व कौशल्ये या मूल्यांचे दर्शन घडवणारी ठरली.

ज्यांच्या दूरदृष्टीने अनेक पिढ्यांना प्रेरणा दिली आहे, अशा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या देदीप्यमान प्रवासाचा गौरव या स्पर्धेच्या माध्यमातून करण्यात आला. त्यांनी या स्पर्धेला भेट देत विजेत्यांचा गौरव केला.

स्पर्धेस पनवेल चेस असोसिएशनचे सचिव चंद्रशेखर पाटील, उपाध्यक्ष समीर परांजपे, जेबीएसपी संस्थेचे सदस्य अ‍ॅड. राहुल घरत, अर्चना ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित पाहुण्यांनी बुद्धिबळ या बौद्धिक खेळाला प्रोत्साहन देण्याच्या संस्थेच्या उपक्रमाचे कौतुक केले.

या स्पर्धेला जेबीएसपी संस्थेच्या विविध शाळा आणि महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अवघ्या चार दिवसांच्या नोंदणी कालावधीत ९७ स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला. स्पर्धा तीन वयोगटांत पार पडली. संस्थेच्या विविध शाखांमधील विद्यार्थ्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात एकजूट निर्माण करणे हे या स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्य ठरले.

## मुरूडमध्ये तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात क्रीडा व युवा कार्यक्रम मंत्रालय संचालित मेरा भारत रायगड आणि ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था रेवदंडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात झाली. यामध्ये कबड्डी, खो-खो, धावणे आणि गोळाफेक या खेळांचा सहभाग होता.

स्पर्धेची सुरुवात सामाजिक कार्यकर्ते राजू म्हशीलकर यांनी श्रीफळ वाढवून आणि खेळाडूंना शुभेच्छा देऊन झाली. स्पर्धेस जिल्हा युथ आयकॉन तपस्वी गोंधळी, ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. नेहा राऊत, भारत बागवे, ओएसिस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रतीक कोळी, सहसचिव साहिल साळुंखे, दर्श नागोटकर, कोकण विभागीय बॉडी बिल्डर फेडरेशनचे युवा सदस्य प्रतीक पाटील, वेदांती



महाडिक, मनस्वी वायरे, श्रवण घाटबाणे उपस्थित होते. त्याचबरोबर नगराध्यक्ष आराधना दांडेकर, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, नगरसेवक मनोज भगत, माय भारत रायगडचे जिल्हा युवा अधिकारी अमित पुंडे, सर एसए शैक्षणिक संकुलाचे मुख्याध्यापक सरोज राणे आदींच्या शुभेच्छाभेटी तथा सहकार्य लाभले.

कबड्डी स्पर्धेत पुरुष गटामध्ये मुरूड पद्मदुर्ग संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर संघर्ष मजगाव संघाने द्वितीय क्रमांक मिळवला. महिला गटातील खो-खो स्पर्धेत विश्व अकॅडमी वॉरियर्स संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर प्रिझम रणरागिनी संघाने द्वितीय क्रमांक मिळवला.

गोळाफेक स्पर्धेत पुरुषांमध्ये ऋतिक जेवले याने प्रथम, सुबोध पाटील याने द्वितीय आणि रोनक भायदे याने तृतीय क्रमांक मिळवला. महिलांमध्ये स्पर्धेत संचिता सवतीकर प्रथम, प्रियंका धोत्र द्वितीय आणि विना काकडेने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

४०० मीटर धावणे शर्यतीत पुरुषांमध्ये यश एकशिंगे प्रथम, सुबोध पाटील द्वितीय आणि ऋग्वेद बेलोशी याने तृतीय क्रमांक मिळवला. महिलांमध्ये छाया रायदास प्रथम, नेहा महाडिक द्वितीय आणि स्नेहा मानकरने तृतीय क्रमांक मिळवला. त्याचप्रमाणे २०० मीटर धावणे शर्यतीत प्रणाली तळेगावकर प्रथम, नेहा महाडिक द्वितीय आणि मधुरा दळवीने तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले.

## तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत 'सीकेटी'चा स्वराज पाटील अव्वल



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांमध्ये धोरणात्मक विचारशक्ती, एकाग्रता, क्रीडाक्षमता यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) लॉ कॉलेज खांदा कॉलनीतर्फे तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाचा स्वराज सचिन पाटील (अकरावी सायन्स) या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला.

याचबरोबर ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागाबद्दल तसेच उल्लेखनीय कामगिरीबद्दल लॉ कॉलेजतर्फे उत्कृष्ट सहभाग करंडक सीकेटी विद्यालयास प्रदान करण्यात आला. क्रीडा शिक्षक मनोज पाटील यांचे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## ४०+ जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा उत्साहात

### जय भवानी वाशी संघाने गाजवले मैदान

**धाटाव : प्रतिनिधी**

श्री राम क्रीडा मंडळ, जांबुटेप (ता. पेण) यांच्या वतीने आयोजित रायगड जिल्हास्तरीय ४० वर्षांवरील पुरुष गटाची कबड्डी स्पर्धा नुकतीच झाली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक ग्रामस्थ मंडळ मेढेखार संघाने पटकाविला, तर मुख्य आकर्षण ठरला तो जय भवानी वाशी संघाचा दमदार, शिस्तबद्ध आणि अनुभवसंपन्न खेळ.

रायगड जिल्ह्यातील १६ आमंत्रित संघांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. जिल्ह्यातील अनेक नामवंत व कसलेले खेळाडू, ज्यांनी आपल्या कारकिर्दीत जिल्ह्यातील असंख्य मैदाने गाजवलेली आहेत त्यांनी या ठिकाणी आपले क्रीडा कौशल्य दाखवले. उत्कृष्ट संघभावना, मजबूत बचाव आणि अचूक चढाईच्या जोरावर जय भवानी वाशी संघाने एकामागून एक बलाढ्य संघांना धूळ चारत थेट अंतिम फेरीत प्रवेश केला आणि उपविजेतेपद पटकावले.

वयाची चाळीशी ओलांडली असली तरी मैदानावर उतरलेले हे अनुभवी खेळाडू तरुणांनाही लाजवेल असा वेग, ताकद आणि डावपेच दाखवत होते. अनुभव हीच खरी ताकद याची प्रचीती या संघाने संपूर्ण स्पर्धेत दिली.



वैयक्तिक कामगिरीत वाशी संघाचे खेळाडू सहदेव बर्डे यांनी आपल्या अचूक, वेगवान आणि धडाकेबाज चढायांमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत त्यांना उत्कृष्ट चढाईपटूचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. बचावफळीतील खेळाडूंचाही मोलाचा सहभाग राहिला. संदेश बामणे आणि शशिकांत लहाने यांनी उत्कृष्ट कोपरा रक्षक म्हणून खेळताना प्रतिस्पर्धी चढायांना वारंवार अपयशी ठरवले. त्यांच्या अचूक टायमिंग आणि ताकदीच्या पकडींमुळे अनेक सामन्यांत संघाला निर्णायक आघाडी मिळाली. मध्य रक्षणाची जबाबदारी समर्थपणे सांभाळताना विश्वास जोगडे आणि महेश मगर यांनी अनुभवाचा पुरेपूर उपयोग करत विरोधी संघांच्या आक्रमणावर प्रभावी लगाम घातला. याशिवाय दिनेश रटाटे यांनी चढाई व बचाव दोन्ही आघाड्यांवर प्रेक्षणीय कामगिरी करत संघाच्या यशात मोलाचा वाटा उचलला.

स्पर्धेत तृतीय क्रमांक जय हनुमान उंडरगाव आणि चतुर्थ क्रमांक काळंबादेवी स्पोर्ट्स गडब संघाने प्राप्त केला. चारही विजेत्या संघांना चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

संपूर्ण स्पर्धेदरम्यान कबड्डीप्रेमी प्रेक्षकांची मोठी गर्दी पहायला मिळाली. वयावर मात करत मैदानात उतरलेल्या ज्येष्ठ पण जिद्दी खेळाडूंनी दाखवलेली झुंजार वृत्ती, शिस्त आणि संघभावना उपस्थितांची मने जिंकून गेली.

## टी-२० क्रिकेट मालिकेसाठी ख्रिस्टियन क्लार्क न्यूझीलंड संघात

### भारताविरुद्ध आज पहिला सामना



**नागपूर : प्रतिनिधी**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी-२० मालिकेला बुधवार (दि. २१)पासून सुरुवात होत आहे. या महत्त्वपूर्ण मालिकेच्या एक दिवस आधीच न्यूझीलंडच्या संघात अचानक मोठा बदल करण्यात आला आहे. न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू मायकेल ब्रेसवेल दुखापतग्रस्त झाल्याने पाहुण्या संघासमोर पेच निर्माण झाला असून त्याच्या जागी २४ वर्षीय युवा वेगवान गोलंदाजाचा संघात समावेश करण्यात आला आहे.

इंदूरमध्ये खेळल्या गेलेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यादरम्यान मायकेल ब्रेसवेलला दुखापत झाली होती. त्याच्या डाव्या पायाच्या स्नायूला ताण आल्याने त्याला मैदान सोडावे लागले होते. याच कारणामुळे तो पहिल्या टी-२० सामन्यात खेळण्याची शक्यता धूसर आहे.

ब्रेसवेलसोबतच वेगवान गोलंदाज डम मिल्ने हादेखील हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीतून सावरत आहे. परिणामी हे दोन्ही अनुभवी खेळाडू किमान पहिल्या तीन टी-२० सामन्यांना मुकणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांच्या अनुपस्थितीत आता २४ वर्षीय वेगवान गोलंदाज ख्रिस्टियन क्लार्क याला टी-२० संघात पाचारण करण्यात आले आहे.

## नवीन पनवेलमधील ज्येष्ठांचा टाटा मुंबई मॅरेथॉनमध्ये सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या ५० सदस्यांनी नुकत्याच झालेल्या टाटा मुंबई मॅरेथॉनमध्ये सहभागी होऊन आनंद लुटला. सकारात्मक दृष्टी ठेवून उत्साह कायम ठेवल्यास जीवनाच्या दुसऱ्या इनिंगमध्येदेखील आनंद घेता येतो हा संदेश गेली सलग दहा वर्षे मुंबई मॅरेथॉनमध्ये सहभागी होऊन या संघाचे सभासद देत आहेत.

ऑपरेशन सिंदूरमधील वीरांना सलाम करणारी थीम सादर करत यंदाचा चमू मॅरेथॉनमध्ये सहभागी झाला होता. ही थीम सहभागी व इतर नागरिकांच्या कौतुकास पात्र ठरली. या थीमला अनेकांनी सलाम करत जय हिंदच्या घोषणा दिल्या.




'सीएसएमटी, हुतात्मा चौक, चर्चगेट, मरीन लाइन्स, मेट्रो टॉकीज ते आझाद मैदान या मॅरेथॉनच्या मार्गावर खरंतर फोटोग्राफीसाठी चांगली ठिकाणे आहेत. तरीही सहभागी ज्येष्ठांचा उत्साह पाहून त्यांचेच विविध फोटो काढण्याचा मोह आवरता आला नाही', असे मत गणेश नाईक यांनी व्यक्त केले.

'या मॅरेथॉनविषयी औत्सुक्य होतेच. प्रत्यक्ष सहभागी होऊन सीएसएमटीकडून मॅरेथॉनला सुरुवात झाल्यानंतर ज्येष्ठांच्या उत्साहाने वातावरण भारून गेले व मी मोहीत झाले. हुतात्मा चौकात मेंटली रिटार्डेड व अपंगांची शर्यत बाजूच्या रस्त्याने सुरू झाली. चर्चगेट व मरीन लाईन्सवर दुसऱ्या दिशेने मोठ्या शर्यतीतील धावपटू वेगात धावताना दिसले. त्यांना चीअर अप करण्यासाठी आपोआप आम्ही थांबलो. ज्येष्ठ, अपंग व धडधाकट अशा तीनही अवस्था एकाच वेळी आनंद घेत व आनंद वाटत धावताना पाहिले आणि ईश्वराच्या अगाध लीलेची खात्री पटली. या सर्वांना एकत्र आणणाऱ्या आयोजकांचे आभार,' अशा शब्दांत वर्षा जोशी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## शुबमन रणजी ट्रॉफी स्पर्धेत खेळणार



**राजकोट : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडविरुद्ध वनडे मालिकेतील पराभवानंतर भारतीय कसोटी आणि वनडे संघाचा कर्णधार शुबमन गिलने विश्रांती न घेण्याचा निर्णय घेतला आहे. पंजाबच्या रणजी संघाला बळकटी देण्यासाठी तो गुरुवार (दि. २२)पासून राजकोट येथे सौराष्ट्रविरुद्ध होणाऱ्या महत्त्वाच्या सामन्यात खेळणार आहे.

नुकत्याच संपलेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेत भारताचा १-२ असा पराभव झाला. या मालिकेतील तिन्ही सामन्यांत खेळल्यानंतर २६ वर्षीय शुबमनने थेट लाल चेंडूच्या क्रिकेटकडे वळण्याचा निर्णय घेतला. तो आगामी टी-२० विश्वचषक संघात नसल्याने प्रथमश्रेणी स्तरावर पंजाबच्या बाद फेरीच्या आशा जिवंत ठेवण्याच्या मोहिमेत आता हिरीरीने सहभागी होऊ शकेल.

पंजाबचा संघ सध्या 'ब' गटात पाच सामन्यांत ११ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. माजी विजेत्या पंजाबला बाद फेरीत प्रवेश करण्यासाठी उर्वरित तिन्ही साखळी सामन्यांत निर्भेळ विजय मिळवणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत सलामीला शुबमनची हजेरी संघासाठी विशेष महत्त्वाची ठरू शकते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com